वासाहतिक भारतातील शेतकरी प्रश्न

## प्रकरण तिसरे

# लोकमान्य टिळक आणि महाराष्ट्रातील शेतीप्रश्न

## प्रकरण तिसरे

## लाकमान्य टिळक आणि महाराष्ट्रातील शेती प्रश्न

### १) प्रास्ताविक:

लोकमान्य टिळक यांची १९२० पूर्वीच्या भारतीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली. देशभर त्यांनी इंग्रजांच्या विरुध्द असंतोष निर्माण केला. शेती व शेतक-यांचे प्रश्न यांचा त्यांनी खोलवर विचार केला होता. त्यांचे शेतीविषयीचे विचार महत्त्वाचे आहेत. कारण त्यांनी आपल्या विश्लेषणात शेतक-यांच्या साम्राज्यशाही शोषणाचा प्रामुख्याने विचार केला.

राणीच्या जाहीरनाम्यामध्ये न्याय, नि:पक्षपणा व धार्मिक सहिष्णुता याबद्दल जी आश्वासने देण्यात आली होती त्यामुळे हिंदी लोकांच्या मनात आपल्या राजकीय भवितव्याबद्दल नव्या आशा उत्पन्न झाल्या. लॉर्ड कॅनिंगच्या कारकीर्दीत कायदेमंडळात हिंदी लोकांचे प्रतिनिधी म्हणून कांही बिनसरकारी सभासदांची नेमणूक होऊ लागली. इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस बसण्यास हिंदी उमेदवारांना परवानगी मिळाली. १८६७ मध्ये उदार व सहिष्णु अशा ग्लॅडस्टन सारख्या मुत्सद्याच्या हातांत इंग्लडच्या राजकारणाची सूत्रे गेली. तेंव्हा राजकीय हक्कांबद्दलच्या हिंदी लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. राजकीय क्षेत्रात बॉंबे असोसिएशन ही संस्था १८५२ पासून काम करीत होती. हिंदुस्थान विषयी सहानुभूति असलेल्या इंग्रज मुत्सद्यांचे हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीला साहाय्यमिळविण्यासाठी १८६६ साली दादाभाई नौरोजींनी लंडनमध्ये "ईस्ट इंडिया असोसिएशन" नावाची संस्था स्थापन

केली. तिला हिंदुस्थानातील प्रश्नांची माहिती करुन देण्यासाठी आणि पैशाची मदत करण्यासाठी मुंबई, कलकत्ता इत्यादी ठिकाणी तिच्या शाखा उघडण्यात आल्या होत्या. पुण्यामध्ये १८७० साली "सार्वजनिक सभा" ह्या राजकीय संस्थेची स्थापना झाली.

दादाभाई नौरोजी, न्या. रानडे यांच्यासारखे समाजसुधारकच त्या काळी राजकीय क्षेत्रातहि आघाडीवर होते. त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाप्रमाणे राजकीय विचारसरणीवरहि इंग्लड मधील विचार संप्रदायाची छाप दिसून येते. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला अनुसरुन जबाबदार राज्यपध्दतीने ध्येय त्यांना मान्य होते. पण प्रत्यक्ष कार्य करताना मात्र लोकांची कुवत आणि पात्रता लक्षात घेऊन त्यांची त्या दिशेने क्रमाक्रमाने पाउले टाकण्याचे त्यांचे धोरण होते. स्वराज्यापेक्षा सुराज्यावर त्यांनी अधिक भर दिला, आणि सत्तासंपादनाची हाव न बाळगतां लोकांनी आपले न्याय्य हक्क सनदशिर पणे प्राप्त करुन घ्यावे असे मत व्यक्त केले. आदर्शांची भडक चित्रे रंगवीत बसण्याऐवजी लोकांना राजकीय शिक्षण देण्याच्या दृष्टीने दैनंदिन जीवनांतील लहानसहान पण निकडीचे प्रश्न त्यांनी हाती घेतले व सरकारी कामकाजातील न्याय, नि:पक्षपातीपणा, कायदेशीरपणा आणि नागरिक स्वातंत्र्य यांच्या जोपासनेसाठी राज्ययंत्रात महत्त्वाच्या सुधारणा सुचविल्या.

"दीनबंधूचे" संपादन नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नाने १८८४ साली मुंबईत २०००० कामगारांची सभा भरुन कामगारांच्या मागण्यांचा एक अर्ज हिंदुस्थान सरकारकडे पाठविण्यात आला. कामगारांच्या गा-हाण्यांची दाद मागण्यासाठी लोखंडयांच्या प्रयत्नाने "मिलहॅन्डस असोसिएशन"

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

ह्या हिंदुस्थानातील पहिल्या कामगार संस्थेची स्थापना झाली होती. अशा प्रकारे कारखानदार व कामगार हे दोन नवीन वर्ग क्षितीजावर येत होते.

१८८३ साली इल्बर्ट विधेयकाने हिंदी न्यायाधिशांना युरोपियन लोकांनी संघटीत चळवळ करुन त्यात बदल करण्यास भाग पाडले. यामुळे भारतीय नेत्यांच्यामध्ये विचारमंथन सुरु झाले. त्यांना स्वत:ची अशी एक अखिल भारतीय स्वरुपाची राजकीय संस्था स्थापन करण्याची आवश्यकता तीव्रतेने वाटत होती. यातच काही ब्रिटीश अधिका-यांनी पुढाकार घेऊन २८ डिसेंबर, १८८५ रोजी मुंबईत राष्ट्रीय सभा स्थापन केली. जिचे पितृत्व इंग्रज मुत्सद्यांकडे नि मातृत्व हिंदी नेत्याकडे होते. ती राष्ट्रीय सभा हे एक राजकीय असंतोषाची वाफ जाण्यासाठी ठेवलेले झाडप असावे.[१] अशी त्यावेळेची परिस्थिती होती. म्हणून ब्रिटीश साम्राज्याला विरोध करण्यास अवतीर्ण झालेली आशियातील पहिली शक्ती म्हणजे हिंदी राष्ट्रीय सभा होय.

या दरम्यानच्या काळात महाराष्ट्राचे नेतृत्व म. जोतीराव फुले, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, न्यायमूर्ती माधवराव रानडे, डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती तेलंग, नारायणराव चंदावरकर आणि मामा परमानंद ह्यांच्याकडे होते. याकाळात महाराष्ट्रात जी खुद्द जनतेने चालविलेली असे म्हणता येईल अशी राजकीय चळवळ नव्हती. म. जोतीराव फुल्यांनी कनिष्ठ वर्गात शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक समतेसाठी आणि मानवी हक्क संपादन करण्यासाठी चळवळ केली. सरकारकडे त्यांची गा-हाणी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.[२]

या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात एक नवे नेतृत्त्व हळूहळू उदयास येत होते. राजकारण हा फावल्या वेळातील उद्योग नसून संपूर्ण जीवन

व्यापणारे ते कार्य आहे. लोक जागृती साठी लोकांच्या भावना दुखावून चालणार नाही, काँग्रेसने जास्तीत जास्त लोकांमध्ये गेले पाहिजे, त्यासाठी लोकांची भाषा वापरली पाहिजे. राजकारणासाठी देहदंड सोसायची तयारी ठेविली पाहिजे इत्यादि विचार या काळात लोकमान्य टिळक यांनी मांडले आणि या विचारा भोवतीच आपली राजकीय चळवळ त्यांनी उभी केली.

२) लोकमान्य टिळक यांचे संक्षिप्त चरित्र:

टिळकांचे आजोबा रामचंद्रपंत कोकणात रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील चिखलगांवचे, ते मोजणी खात्यात नोकरी करित. चिखलगांवची खोती त्यांच्याकडे होती. पण रामचंद्रपंत विरक्तवृत्तीचे; त्यांनी संसार केला, तरी त्यांचा ओढा वैराग्याकडे होताच म्हणूनच ते पत्नीच्या मृत्यूनंतर काशीला गेले.

"रामचंद्रपंत घरसोडून निघून गेले, तेंव्हा टिळकांचे वडील गंगाधरपंत शाळेत शिकत होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी शिक्षण खात्यात नोकरी केली. ते आपल्या शिकविण्याच्या कामात कुशल होते. शिवाय शालोपयोगी पुस्तके लिहून ते आपल्या उत्पन्नात मधून मधून थोडी भर टाकीत असत.[३]

गंगाधर पंतांच्या पत्नीचे नांव पार्वतीबाई, दिनांक २३ जुलै, १८५६ रोजी रत्नागिरी येथे पार्वतीबाईना मुलगा झाला. (शाके १७७८, आषाढ वद्य ६) त्याचे नांव "केशव" ठेवण्यात आले. बाळ रवीच्या उपासनेने आपणास पुत्रप्राप्ती झाली अशी पार्वतीबाईची श्रध्दा होती.

त्यामुळे त्या त्याला "बाळ" म्हणून हाक मारीत हेच "बाळ" नांव पुढे कायम झाले.

१८६१ सालच्या दस-याच्या मुहुर्तावर त्याला शाळेत घालण्यात आले. भिकाजी कृष्ण पटवर्धन हे त्यांची रत्नागिरी येथील पहिले गुरुजी. दोन वर्षांनी गंगाधर पंताची बदली असि. डे. एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून पुण्यास झाली. टिळकांचे शिक्षण पुण्यात सुरु झाले. सर्व अंकगणित, समीकरणा-पर्यंत बीजगणित इतकी त्यांची तयारी इंग्रजी शाळेत जाण्याच्यावेळीच झाली होती. त्यांची बुध्दी कुशाग्र होती.

१८७३ च्या सुरवातीस टिळक डेक्कन कॉलेजात दाखल झाले. कॉलेजमध्ये सुमारे दीडशे विद्यार्थी होते. आपल्या कॉलेज जीवनात टिळकांनी बराच मित्रपरिवार गोळा केला होता. टिळकांच्या वेळी डेक्कन कॉलेजात प्राध्यापक "वर्डस्वर्थ" आणि प्राध्यापक "शूट" हे दोघे इंग्रज प्राध्यापक होते. त्यांची टिळकांना बरीच मदत होई. इंग्रजी रितीरिवाज आणि इंग्रजी वाङ्मय यांची ओळख याच दोन्ही प्राध्यापकांनी टिळकांना करुन दिली. प्रा. वर्डस्वर्थ यांनी मिल्टन, शेले, बायरन या तीन श्रेष्ठ इंग्रजी कवीचे काव्य टिळकांना शिकविले, तर प्रा. शूट यांनी गिबन, बर्क, ह्यूम ह्यांच्या विषयी माहिती दिली. प्रा. केरोपंत छत्रे यांनी टिळकांना गणित शिकविले. टिळकांच्या गणित बुध्दीचे त्यांना विशेष कौतुक वाटे. असामान्य चिकाटी कुशाग्र बुध्दी आणि व्यासंग प्रीती हे त्यांचे अमोलिक गुण त्यांच्या विद्यार्थी दशेतच प्रगट झालेले दिसतात.

टिळक १८७६ साली बी.ए. परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. बी.ए. ला त्यांचा विषय गणित हा होता. १८७७ साली

ते गणितात घेऊन एम्.ए. ला बसले. पण त्या परिक्षेत त्यांना यश आले नाही. पुढे त्यांनी एम्.ए.चा नाद सोडला असे दिसते. १८७९ साली डिसेंबर महिन्यात टिळक एलएल.बी. झाले. एलएल.बी. च्या अभ्यासापैकी हिंदुधर्मशास्त्र हा टिळकांचा मोठा आवडता विषय म्हणून हिंदुधर्मशास्त्राचे मुख्य ग्रंथ व त्याचवरील टीका वगैरेचा अभ्यास टिळकांनी फार लक्षापूर्वक केलेला दिसून येतो. पुढे लिहिलेल्या धर्मशास्त्रावरील लेखात व तत्त्वज्ञानावरील लेखात या त्यांच्या सखोल ज्ञानाचा पडताळा येतो.

कॉलेजमधून बाहेर पडल्यानंतर काय करायचे हे ठरविताना शिक्षकाचा पेशा का स्वीकारयचा याचा टिळकांनी खोलवर विचार केलेला दिसतो. राष्ट्राच्या उभारणीसाठी शिक्षणाची गरज आहे हे लक्षात घेऊन त्यांनी शिक्षकाचा पेशा स्वीकारला. तो त्यांना मनापासून आवडे. लोकमताचे धिटाईने मंडन करण्यात व स्वहित निरपेक्ष लोकांसाठी भांडण्यात विद्येचे फळ आहे असे त्यांचे मत होते व त्यासाठी ते शिक्षण क्षेत्राकडे वळले.

आगरकरांच्या सारखा स्वाभिमानी, होतकरु मित्र त्यांना लाभला. त्यात'मालाकार,' चिपळूणकरांचे मौलिक मार्गदर्शन व सक्रीय सहाय्य लाभले आणि त्यातूनच "न्यू इंग्लिश स्कूलची" स्थापना १८८० साली या तरुण ध्येयवेडया लोकांनी केली. १८८४ साली संस्थेचे कॉलेज उघडले. तेथे टिळक व त्यांचे इतर सहकारी प्राध्यापकही बनले. भारतीय पुनरुध्दाराचे काम फक्त शाळा काढून भागणारे नाही तर त्यासाठी इतर अनेक साधनांचा शोध करुन त्यांचाही उपयोग करुन घेतला पाहिजे, असे त्यांना व त्यांच्या सहका-यांना वाटू लागले व त्यातूनच "केसरी" चा जन्म झाला. "केसरी"

पत्र त्यांनी सहका-यांच्या मदतीने १८८१ मध्ये सुरु केले. शिक्षक, प्रोफेसर, संपादक अशा भूमिका त्यांनी बजावल्या.

टिळकांनी "न्यू इंग्लीश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज, केसरी-मराठा, वृत्तपत्राचे संपादक, जिनिंग फॅक्टरी, लॉ क्लासेस इत्यादी सारखे कर्तृत्वाचे मार्ग गवसले पण त्या मार्गानेच ते चिकटून राहू शकले नाहीत. कारण सहका-यांशी मतभेद झाल्यावर त्यांनी शिक्षण संस्था सोडली. यामुळे त्यांच्या जीवनाचे एक पर्व येथे संपले व दुसरे सुरु झाले. ती फरक एकंदरीने त्यांच्या स्वत:च्या दृष्टीने व देशाच्या दृष्टीने अतिशय अनुकूल झाला असेच म्हणावे लागते.

२ केसरीची व्यवस्था व जबाबदारी आपणांकडे घेतल्यानंतर १८८५ चे बर्वे प्रकरण व १८८९ चे क्रॉफर्ड प्रकरण यामुळे त्यांना सार्वजनिक जीवनाची तोंड ओळख झाली. १८९४ मध्ये गणाशोत्सवास राष्ट्रीय स्वरुप त्यांनी दिले. शिकजयंतीच्या उत्सवास उत्साहाने चालना दिलि. १८९५ मध्ये ते मुंबई कायदे कौन्सिलात निवडून आले. प्लेग व दुष्काळ काळातील त्यांनी केलेल्या सार्वजनिक कार्याची ती जणू पोच पावतीच होती. यापुढील काळात भारतीय जीवनातील प्रश्न मग धार्मिक असोत किंवा आर्थिक असोत किंवा राजकीय हक्कासंबंधीचे असोत, त्यांची सोडवणूक ते आपल्या परीने करण्याचा प्रयत्न करित.

लो. टिळकांच्या जीवनात कारावासाला महत्त्वाचे स्थान आहे. त्यांना व आगरकरांना १८८२ मध्ये कोल्हापूरच्या छत्रपतींच्या संदर्भात पहिला कारावास भोगावा लागला. टिळकांवरचे दुसरे दोन खटले हे राजद्रोहाचे खटले म्हणून प्रसिध्द आहेत. राजद्रोहाबद्दल टिळकांना प्रथम

दि. २७ जुलै, १८९७ ला पकडण्यात आले. दि. १५ सप्टेंबर, १८९७ ला त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. भारतीय नेत्याने कोणतेही दिव्य सहन करण्यास तयार असले पाहिजे, राज्यकर्त्यांच्या सदिच्छेवर श्रध्दा ठेवून अर्ज विनंत्या करुन भागणार नाही. राज्यकर्त्यांशी सामना देऊन पारतंत्र्याविरुध्द जनतेला चेतवून आपला हेतू साध्य करुन घेतला पाहिजे, प्रसंगी यासाठी नेत्याने कारावास भोगला पाहिजे, असे राजकारणातील नवे सूत्र त्यांनी भारतीय जनतेस दिले. दिनांक २४ जून, १९०८ रोजी मुंबईस टिळकांना पकडले. २३ जुलै, रोजी दुसरा राजद्रोह खटला सुरु झाला. "देशाचे दुर्दैव" व "दुहेरी इषारा" वगैरे लेखांबद्दल सहा वर्षे काळापाण्याची त्यांना शिक्षा झाली. या सहा वर्षांच्या कालावधी-मध्ये त्यांनी "गीतारहस्य" लिहिले.आणखी एका कारावासाची आपत्ती देखील लो. टिळकांच्यावर १९१६ साली आली होती, पण दिनांक ८ नोव्हेंबरला हायकोर्टाने "स्वराज्याची चळवळ" कायदेशीर ठरवून जामीन रद्द केले व तिस-या राजद्रोहाच्या खटल्याची आपत्ती टळली.

१९१८ साली टिळक शिष्टमंडळासह विलायतेस जाण्यास निघाले. प्रथम बंदी होऊन पुढे त्यांना परवानगी मिळाली. दि. १७ नोव्हेंबर, १९०१ साली निर्माण झालेले ताईमहाराजा प्रकरण १९२० साली सर्व प्रश्नांसह निकालात निघाले. अखेर दिनांक ३१ जुलै शनिवारी रात्री १२ वाजून ४० मिनीटांनी टिळकांचा मुंबई येथील सरदार गृहात अंत झाला आणि दिनांक १ ऑगष्ट, १९२० रोजी त्यांचा पार्थिव देह लाखोंच्या साक्षीने पंचत्वात विलीन झाला.

प्रस्तुत अभ्यासात टिळकांचे शेती प्रश्नावरील "दै केसरीत" प्रकाशित झालेले फक्त १९०८ पर्यंतचे लेखच विचारात घेण्यात आले आहेत. या काळात

त्यांनी "केसरीत" लेख लिहून अनेक ठिकाणी शेतक-यांच्या सभा घेऊन दुष्काळाबद्दल व दुष्काळातील त्यांच्या अधिकाराबाबत जागृती करण्याचा प्रयत्न केला होता.

३) लो. टिळक आणि जहाल राष्ट्रवादी चळवळ:काही ठळक वैशिष्टये:

उदारमतवाद्यांप्रमाणे टिळकांचीहि प्रथम इंग्रज लोकांच्या औदार्यावर व न्यायबुध्दीवर श्रध्दा होती. इंग्रज जनतेमधील हिंदुस्थान विषयीचे औदासीन्य व अज्ञान दूर केल्यास आपणांस हवे असलेले राजकीय हक्क तिच्याकडून मिळवतां येतील अशी त्यांची अपेक्षा होती म्हणूनच आरंभीच्या काळात ध्येय व धोरण या बाबतीत राष्ट्रसभेतील अधिकारारूढ पक्षाशी त्यांचा कोणताच मतभेद नव्हता. मात्र गुलामांची मुक्तता, अनिर्बंध व्यापार इत्यादिकासंबंधी विलायतेत ज्या अनेक चळवळी झालया, त्यांचा इतिहास पहाता सतत ओरड केल्याखेरीज ब्रिटीश पर्लमेंटकडून कोणतेहि हक्क मिळत नाहीत हे टिळकांच्या लक्षात आले होते. म्हणूनच "चळवळ सतत चालू ठेवणे आणि तिचा विस्तार उत्तरोत्तर वाढवीत नेणे"[४] या गोष्टीकडे टिळकांनी विशेष लक्ष दिले.

लोकसंग्रहाच्या दृष्टीने राष्ट्रीय महोत्सवांचे महत्त्व टिळकांच्याच प्रथम लक्षात आले म्हणून शिवाजीचे स्मारक, सार्वजनिक गणपती उत्सव इत्यादि उपक्रम सुरु करून अनेक जातींच्या लोकांना एकत्र आणले आणि किर्तन, पुराण, पोवाडे, व्याख्यान इत्यादी लोकांच्या परिचयाच्या असलेल्या सर्व साधनांचा राजकीय चळवळीच्या प्रसारासाठी उपयोग करून घेतला. इनामदार, वकील आणि शिक्षक यांच्याबरोबर व्यापारी, कारागीर आणि शेतकरी यांना राष्ट्रीय चळवळीत सामील करून घेऊन

त्यांनी तिच्या व्याप्ति व सामर्थ्य वाढविले . "कॉंग्रेस मध्ये जो नवीन मतप्रवाह टिळक आणू इच्छीत होते त्यातूनच जहाल. मवाळवाद सुरु झाला."[५]

टिळकांची दृष्टि जरी याप्रमाणे वास्तववादी व लोकाभिमुख होती, तरी चिपळूणकरांचा परंपरानिष्ठ राष्ट्रवाद हाच त्यांच्या विचारसरणीचा पाया होता. हिंदू धर्माचे व्यापक तत्त्वज्ञान, भारतीय आर्यांची प्राचीन संस्कृति, रामदासांचा महाराष्ट्र धर्म आणि पेशवेकालीन मराठी साम्राज्य यांच्याबद्दलचा अभिमान जागृत करुन त्यांनी लोकांना ध्येयनिष्ठेची व लढाऊ बाण्याची शिकवण दिली.

सनदशीर मार्ग अशक्य असून केवळ कायद्याची चौकट सांभाळून चळवळ करता येईल व त्या संदर्भात इंग्रजांचे हिंदुस्थानातील राज्य हेच मुळी बेसनदशीर आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. अशा राज्याकडून राजकीय हक्क तरी कायदेशीर रीत्या कितपत मिळवता येतील याबद्दल शंका व्यक्त करुन कायदा व नीती यांची फारकत होते, तेव्हा कायदा मोडणे हे ही प्रसंगी अपरिहार्य व आवश्यक बनते. टिळक म्हणतात,"कायदा मोडला गेला तर शिक्षा होणार परंतु कायदा जुलमी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे."[६] अशी भूमिका त्यांची होती. पुढील सत्याग्रहाचा किंवा जहाल राष्ट्रवादाचा तो पायाच होता. यानंतर इंग्रजाशी लढा देण्याची साधने म्हणून त्यांनी स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही शस्त्रे पुढे आणि स्वराज्य हे या राजकारणाचे ध्येय बनविले.

जहालांना इंग्रजांच्या राज्याचा अनुभव मोलाचा वाटत होता. इंग्रजाने येथील राज्य तलवारीच्या जोरावर मिळविले आहे. ते परोपकारासाठी मिळविले नसून स्वहितासाठी मिळविले आहे आणि त्या

हिताला धक्का बसल्यावाचून आपणांस काहीही मिळायचे नाही" ही जहालांची पर्यायाने टिळकांची भूमिका होती. त्यासाठी केवळ स्वदेशीचा पुरस्कार करुन चालणार नाही, बहिष्काराचे शस्त्रही उपसावे लागेल आणि तेही केवळ आर्थिक क्षेत्रापुरतेच नव्हे. १९०७ च्या जानेवारीत कलकत्ता येथे केलेल्या एका भाषणात टिळक म्हणाले, "आमच्या जवळ शस्त्रे नाही, आणि शस्त्रांची गरजही नाही, आमच्या जवळ एक अधिक प्रभावी शस्त्र, राजकीय शस्त्र आहे. ते म्हणजे बहिष्कार. या देशाचा सारा शासनव्यवहार मूठभर इंग्रज आमच्या साहाय्याने चालवितात. सर्व कनिष्ठ नोकऱ्या आमच्याकडे आहेत. सारे सरकार आमच्या साहाय्याने चालले आहे. पण आम्ही आपसात सहकार्य केल्यास जे आज आम्हीच चालवतो ते आम्ही आपल्या हाती घेऊ शकतो ह्या आमच्या सामर्थ्याबद्दल आम्हांस अज्ञानात ठेवण्यात आले आहे. सर्व ताबा आमच्याकडे आला पाहिजे, आम्हांला शासन चालवायचे आहे, केवळ कारकून व्हायचे आणि राहायचे नाही.

## जहालवादांची काही वैशिष्टये:

### १) साध्य साधन संबंध:

जहालांच्या वैचारिक क्रांतीचे सार साध्यसाधन संबंधाच्या पुनर्निर्धारणात साठवलेले आहे. निरनिराळया शास्त्रांचा आधार घेऊन टिळक हे पटवून देतात की माणसाची कृती ही संदर्भाशी प्रस्तुत आणि साध्य प्राप्तीसाठी पुरेशी शक्तीमान हवी. यासाठी त्यांनी गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनास दिलेला संदेश, शिवाजीने अफझलखानाचा केलेला वध, यांचा उल्लेख करुन म्हटले आहे की, या पाठीमागचा हेतू लक्षात घेतला पाहिजे. "कूपमंडूकाप्रमाणे तुमच्या नैतिक दृष्टीला दंड विधानाच्या मर्यादा

पडू देऊ नका. भगवद्गीतेच्या उदात्त वातावरणातून बाहेर या"[८]

दुष्टांशी त्यांच्या पातळीवरून सामना द्यावा लागतो असे टिळकांचे मत होते. साधन शुचित्वाचा विचार करून अशा संघर्ष[illegible]कचरणे हे कर्तव्यच्युत होण्याचे लक्षण आहे. यासाठी त्यांनी संसदीय, बिगर-संसदीय, शांततामय आणि हिंसात्मक अशा सर्व साधनांचा उपयोगासही त्यांची मान्यता होती.

### २) राष्ट्रीय चळवळीचे लोकशाहीकरण:

टिळकांची भूमीका परकीयांशी संघर्ष करून हक्क प्राप्त करून घेण्याची होती. संघर्ष करावयाचा तर चळवळीचे सामर्थ्य मोठे पाहिजे. त्यासाठी चळवळ लोकापर्यंत नेऊन त्यांचा पाठिंबा प्राप्त करणे आवश्यक आहे. याविषयी ते लिहितात, "आमचा देश म्हणजे हे हजारो शेतकरी आणि व्यापारी त्यांच्या मध्येच आपणास राहावयाचे आहे. आमचे आजोबा पणजोबा त्यांच्यात राहिले होते. आपले नातू-पणतू त्यांच्यातच राहणार आहेत. ते अज्ञानी असतील तर आपण त्यांना शहाणे केले पाहिजे आणि सज्ञान असतील तर ते काय म्हणतात ते समजावून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे."[९] कुठल्याही परिस्थितीत त्यांना दूर ठेऊन चालणार नाही. राष्ट्रीय चळवळीच्या लोकशाही-करणाचा हा आग्रह टिळकांच्या जहालवादाचे दुसरे महत्वाचे वैशिष्टये होते.

### ३) राष्ट्रवादास धार्मिक अधिष्ठान:

राष्ट्रीय चळवळ लोकांपर्यंत न्यावयाची म्हणून ती लोकभावनेस स्पर्शून जाणाऱ्या परिभाषेत मांडली पाहिजे. यासाठी टिळकांनी राष्ट्रीय चळवळीतील निरनिराळया संकल्पना आणि घोषणांना धार्मिक

आशय प्राप्त करून दिला. स्वराज्याचा प्रश्न फक्त राजकीय नाही, तो धार्मिक आहे असे ते म्हणतात, ते लिहितात, "स्वराज्य हा आपला हक्क आहे असे मी म्हटले पण ती या प्रश्नाकडे पाहण्याची ऐतिहासिक आणि युरोपियन पध्दती झाली. टिळक या पुढेही जाऊन म्हणतात; स्वराज्य हा आपला धर्म आहे. अग्नीपासून उष्णता जशी वेगळी करता येत नाही त्याचप्रमाणे आमच्यापासून स्वराज्य वेगळे करता येणार नाही." [१०]

अग्नीचा ज्या अर्थाने उष्णता हा धर्म आहे त्या अर्थाने स्वराज्य माणसाचा धर्म आहे, परंतु टिळक याच्याही पुढे म्हणतात स्वराज्य स्वातंत्र्याच्या संकल्पना वेदान्तातील अद्वैतवादाशी निगडीत करतात. "परमात्मा हे सर्वश्रेष्ठ असे चिरंतन अस्तित्व आहे आणि प्रत्येक मनुष्य मात्रात त्याचा अंश आहे. त्यामुळे प्रत्येकाजवळ समान स्वायत्त आत्मीक क्षमता आहेत.[११] "अर्थातच इतरांवर सत्ता गाजविण्याचा किंवा त्यास गुलाम करण्याचा कोणासच अधिकार नाही. स्वातंत्र्य हा आत्म्याचा प्रमुख गुण आहे आणि आत्मा चिरंतन असल्यामुळे स्वातंत्र्यही अमर आहे."[१२]

हा झाला राष्ट्रवादाचा अध्यात्मिक आधार. टिळक त्याला धर्माशी निगडीत करतात ते म्हणतात, "धर्म हा राष्ट्रवादातील एक महत्त्वाचा घटक आहे. "धर्मामध्ये एकतेची शक्ती असते, देशभक्तांनी राष्ट्रवादाची घडण करताना या शक्तीचा फायदा घेण्यास काहीच हरकत नाही"[१३] असे टिळक म्हणतात. ऐक्याची भावना ज्या ज्या पध्दतीने बळकट करता येईल त्याचा आवलंब केला पाहिजे या दृष्टीने हिंदू परंपरा आणि उत्सवाचे महत्त्व हे लक्षात घेऊन त्याचा राजकीय संघटनासाठी उपयोग केला. यामुळे लोकांच्यात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी केले.

वरील प्रमाणे टिळकांच्या जहाल राष्ट्रवादाची वैशिष्टये होती व याच उद्देशाने त्यांनी शेतक-यांना राष्ट्रीय चळवळीत सामील करून घेतले व त्यांच्या परिस्थिती विषयी, शेतीविषयी सविस्तर लेखन केसरी वर्तमान-पत्रात केले.

लो. टिळक आपल्या जहाल विचाराविषयी म्हणतात, "जहाल हे प्रगतीचे सूचक नांव आहे. आज आम्हाला जहाला म्हणतात पण आमची मुलेबाळे उद्या आम्हाला नेमस्त म्हणतील आणि स्वत:स जहाल म्हणून लागतील, हे ध्यानात ठेवले पाहिजे."१४

काँग्रेसच्या अधिवेशनापुढे शेतक-याचा पुतळा भालेकर यांनी उभा केला होता. त्याची मार्मिक नोंद टिळकांनी घेतली. ते लिहितात की पुतळा उभा करणा-याच्या हेतूकडे दुर्लक्ष केले तरी काँग्रेसमध्ये शेतकरी सामील झाल्याशिवाय ती ख-या अर्थाने राष्ट्रीय होणार नाही. या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून शेतक-याच्या जागृतीवर त्यांनी भर दिला.

४) लो. टिळक यांचे तत्कालीन शेतीसंबंधीचे विचार:

लो. टिळकांनी तत्कालीन शेतीसंबंधी विचार करताना शेती करण्याची पध्दत, शेतीची मालकी व उपाय यावर विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मते पेशवेकालीन शेती ही जुन्या पध्दतीने केली जात होती. आणि त्यात इंग्रजी व्यवस्थेमध्ये कोणताच फरक पडला नाही. शेती ही पूर्णपणे पावसावरती अवलंबून असल्यामुळे पाऊस कमी जास्त पडल्यास वारंवार दुष्काळ पडत होते. यामुळे शेती-तून निघणारे उत्पादन सुध्दा कमी निघत होते. इंग्रजी राजवटीमध्ये त्यांच्या साम्राज्यशाही धोरणामुळे इतर उद्योगधंदे ही बंद पडल्यामुळे या काळात सर्व बोजा शेतीवरच पडला. जमिन कमि व त्यावर उपजीवीका करणा-या लोकांची संख्या जास्त असे वर्णन त्याकाळच्या शेती व्यवस्थेचे टिळकांनी केले आहे. शेती-मध्ये कोणत्याही प्रकारचे आधुनिकिकरण केले नव्हते. जमिनीचा कस सुध्दा वारंवार पिके घेऊन या कालावधीत कमी झाला होता.

इंग्रजी राजवटीमध्ये त्यांनी केलेल्या रयतवारी पध्दतीला काही प्रमाणात टिळकांनी विरोध केला, कारण त्यामध्ये शेतसारा घेण्याची जी तरतूद होती ती टिळकांना मान्य नव्हती. ते याविषयी म्हणतात, "मराठी राज्यांत ऐन सा-याच्या वसुलावर कोणाला दोन टक्के, तर कोणालाप पांच टक्के, या त-हेने देशमुख, देसाई, देशपांडे वगैरे हक्कदार लोकांस सा-याचा भाग मिळत असे, व त्यामुळे जिल्हयातून किंवा तालुक्यातून

या मंडळीचे चांगले वजन होते परंतु मराठी राज्यानंतर अव्वल इंग्रजीतच ही पध्दत मोडली जाऊन जमिनीचे सारे शेतक-यांकडून एकदम सरकारकडे भरण्याची सुरवात झाली. व देसाई, देशमुख वगैरे मध्यम प्रतीचे लोक व त्यांचे वजन कमी होऊ लागले. अशा रीतीने मध्यम प्रतीचा वर्ग मोडल्यानंतर सर्व्हे किंवा पहाणी पुन: पुन: होऊन शेतक-यांचा सारा होईल तितका वाढविण्याची सुरवात झाली. ती इतकी की, या पध्दतीचा एकसारखा आज साठ वर्षे अमंल असल्यामुळे एक वर्ष पाऊस न पडला की, शेतकरी अन्नान्न दशेस येतो हे दुष्काळांच्या उदाहरणांवरुन आंता निर्विवाद सिध्द झाले आहे."[१५] तत्कालीन शेतक-यांकडे जमिनीला खत घालून किंवा अन्य सुधारणा करणे पैसा अभावी शक्य होत नव्हते.

शेतीच्या मालकी विषयी लिहिताना टिळक म्हणतात, "शेतक-यास फक्त नांगर लागेल तिथेपर्यंत जमिन नांगरुन पिक काढण्याचा हक्क आहे. त्याच्याखाली दगडाची किंवा सोन्याची खाण लागली किंवा वर पाखरु असेल तर ते सरकारचेच, त्यामुळे पृष्ठभाग लागवड करुन उत्पन्न काढून सारा भरलाच तरच ती जमिन शेतक-याची नाहीतर ती सरकार काढून घेणार"[१६] थोडक्यात शेती पध्दतीमध्ये नवीन कोणताही बदल ना होता उलट शेतक-यावर सरकारकडून जाचक निर्बंध घातले जात होते असे त्यांचे मत होते.

रयतवारी व जमीनदारी पध्दतीमध्ये रयतवारी पध्दत ही जास्त योग्य आहे हे लो. टिळकांना मान्य होते परंतु इंग्रजांच्या जुलमी सारा पध्दतीमुळे सध्या जमीनदारी पध्दतीपेक्षाही जास्त रयतवारी पध्दतीत शेतकरी नागवला जात आहे. असे मत त्यांनी मांडले आहे.

५) शेतकरी आणि त्याच्या समस्या दुष्काळ, सरकारी शेतसारा:

महाराष्ट्रातील शेकडा ९५% लोकांच्या उपजीवीकेचे साधन शेतीच होते. अनियंत्रित पाऊस, हलक्या जमिनी, पिकांची रोगराई इत्यादीमुळे पिकांचा भरवसा नसे. म्हणून शेतक-यांच्या घरात आठराविश्वे दारिद्र्य सतत वास करित असे. कर्जाचा बोजा शेतक-यांच्या डोक्यावर सतत असे. सरकारी कर न भरल्यास जप्तीची भीती त्यास सदैव असावयाची जमिनीच्या सुधारणेचा तर प्रश्नच नव्हता. शेतक-यांची नेहमी हातातोंडाशी गाठ असल्याने जमिन सुधारणे त्याला होत नसे.

याशिवाय सरकारने नवीन जंगल, अकबारी, रेव्हिन्यू यासारखी खाती सुरु केलीत या सर्व खात्यानी शेतक-यांची आर्थिक पिळवणूकच केली पेशवाईत जंगल खाते नव्हते ते १८७६ साली सुरु झाले यामुळे शेतक-यांना आपली गुरे चारण्यास रान शिल्लक राहिले नव्हते. जळणासाठी लाकूड फाटा बंद झाला, दुष्काळात चा-या अभावी गुरे मरत होती."[१७]

इत्यादी कारणामुळे शेतकरी व त्याची शेती यांची अशी निकृष्ठावस्था झालेली होती, यास कारण परकिय सरकारच होते. शेतकरी बुडाला तर त्यास भांडवल पुरवणारा सावकारही बुडत असे. पण सरकार मात्र आपली वसुली आजची उद्याही करावयास तयार नसे. त्यावर टिळकांनी सरकारास बजावले आहे की, "एकदा हे भिकार देशावर अनावर सुटले म्हणजे मग लक्षावधी बागनेटाने ही त्यांचा प्रतिकार होणे अशक्य आहे."[१८] शेतक-याला दुष्काळ व शेतसारा या दोन समस्यांना तोंड द्यावे लागत होते.

अ) दुष्काळ:

लो. टिळकांच्या काळात महाराष्ट्रात १८७७-७८ व १८९६-९७ व

१९०० या साली मोठे दुष्काळ पडले. या दुष्काळामुळे शेतक-यांची झालेली दैयनीय परिस्थितीचे वर्णन करून शेतक-यांचे अनेक मुलभूत प्रश्न सरकारपुढे मांडलेत. महाराष्ट्रातील हे दुष्काळ अती पाऊस किंवा कमी पाऊस यामुळे पडले होते. या दुष्काळाचा तडाखा समाजातील सर्व स्तरातील शेतक-याना बसला. या दुष्काळापैकी १८९६-९७ च्या दुष्काळाच्यावेळी सरकारने शेतक-यांना काही मदत करण्याचा प्रयत्न केला. मात्र १८७७-७८ साली पडलेल्या दुष्काळाने लोकांच्या मनामध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता. दुष्काळविषयक प्रश्नाविषयी टिळकांनी काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यापैकी दोन महत्त्वाचे प्रश्न म्हणाजे १) दुष्काळाशी टक्कर देण्याइतके सामर्थ्य रयतेत का नाही ? २) दुष्काळाच्या वेळी निर्वाह चालविता येण्याइतकी शिल्लक प्रजेपाशी का नसावी ? टिळक पुढे म्हणातात, युरोपातील सुधारलेल्या राष्ट्रात दुष्काळ पडण्याचीशाक्यताच नाही असे प्रतिपादन करण्यात येते, याचाच अर्थ असा की एका विभागात दुष्काळ पडला तर दुसरीकडून धान्य मागविले जाते व ते महाग धान्य खरेदी करण्याची कुवत रयतेमध्ये असते, अशी परिस्थिती युरोपियन राष्ट्रात आहे. तर मग महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडल्यास मद्रास, बंगाल, ब्रह्मदेश या प्रांतातून तेथील लोकांना पुरून उरेल एवढे धान्य पिकले आहे. पण ते धान्य विकत घेण्यास महाराष्ट्रातील रयतेपाशी पैसेच नाहीत. उन्हातान्हात दिवसभर खडी फोडावी तेंव्हा सहा दिडक्या दृष्टीस पडावयाच्या आणि मग दाणे विकत घ्यायचे। अशी निकृष्ट स्थिती आमची का व्हावी ? वर्षाच्या अखेरीस सरकार-सारा देऊन टाकल्यावर रयतेपाशी काहीच शिल्लक न राहून नवीन सालच्या प्रारंभी धुतलेल्या तांदळाप्रमाणे आम्हास उघडे-नागडे का व्हावे लागते ? दुष्काळ का पडतो याची कारणे

शोधावयाची नसून, दुष्काळाचा धक्का सोसण्याइतके त्राण प्रजेत कां नाही,[१९] इत्यादी मुलभूत प्रश्न टिळकांनी दुष्काळासंबंधी उपस्थित केले आहेत.

सन १८९६ च्या शेवटी महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाने मोठ्या प्रमाणावर जीवीत हानी झाली, त्यावेळी टिळकांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून लोकांना धीर देण्याचा प्रयत्न केला, त्यांनी लोकांना कर्ज काढून सारा भरु नका, आपसात लूट मार करु नका, त्यामुळे सर्वांचा नाश होईल असा लोकांना इशारा दिला. प्रत्येकाने या दुष्काळास धैर्याने तोंड दिले पाहिजे. कनिष्ठ सरकारी अधिका-याना घाबरण्याचे कारण नाही असे सांगितले. ते पुढे म्हणतात असला दुष्काळ लंडनमध्ये पडला असता आणि तेथील मुख्य प्रधान हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलसारखा जर उदासीन राहिला असता तर त्याचे सरकार एका खालवडयात पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळले असते या वेळी टिळकांनी सार्वजनिक सभेच्यावतीने निवेदन काढून सरकारला चांगलेच अडचणीत आणले होते.

दुष्काळावरती टिळकांनी काही उपाय योजनाही सांगितल्या होत्या तसेच सरकारने दुष्काळ निवारण्यासाठी केलेल्या कायदयाची अंमलबजावणी कशा प्रकारे केली पाहिजे याविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याची गरज त्यांनी प्रतिपादली होती.

इंग्रज सरकारने दुष्काळ कां पडला आहे याची चौकशी करुन ताबडतोब उपाय योजना सुचविल्या पाहिजे.त्याचबरोबर लोकांनीही काय केले पाहिजे याविषयी लिहीतात,"हल्लीच्या काळी लोकांची कर्तव्ये दोन प्रकारची आहेत. एक सरकार धान्याचा भाव नियंत्रीत करु शकत नाही

तो करणे, आणि दुसरे फॅमिन रिलीफ कोडात ज्या गोष्टी सरकारने कराव्या म्हणून लिहिले आहे त्या प्रत्येक तालुक्यांत किंवा जिल्हयात नीटपणे होत आहेत की नाही याचा शोध घेवून सरकारास वेळोवेळी जागे करण्याकरिता दर एक ठिकाणी स्थानीक लोकांची कमिटी नेमणे थोडक्यात ठिकठिकाणच्या पुढा-यांनी हा दुष्काळ संपेपर्यंत सरकारच्या कार्यावर सारखी नजर ठेवून लोकांच्या गरजा सरकारच्या कानी घातल्या पाहिजेत. फॅमिन इन्शुअरन्स फंड गिळून टाकणा-या सरकारास पैशाची सबब सांगता येणार नाही. कारण दुष्काळाचा विमा शेतक-यांनी उतरला असून त्याबद्दल प्रत्येक वर्षी दीड कोटी रुपयांची रक्कम गेली पंधरा वर्षे भरीत आहोत. फॅमिन रिलीफ कोड लागू करुन ते नीट अमंलात आणा याबद्दल सगळीकडून तगादा लावल्याशिवाय ताबडतोब उपाय योजणार नाही. यासाठी सरकारकडे हजारो अर्ज गेले पाहिजेत."[२०]

दुष्काळात मिळणा-या सरकारी सवलती लोकांनी पदरात पाडून घेण्यासाठी टिळकांनी "केसरी"तून सतत मार्गदर्शन केले होते. "प्रत्येक गावातील लोकांनी आपल्या गावांतील पीक दहा-अकरा आणे तरी बुडाले अशी खात्री कलेक्टरची किंवा मामलेदारांची करुन दिली पाहिजे. फॅमिन रिलीफ कोडाची कलमे शेतक-यांस सरकारची वेगळी परवानगी घेणे गरजेचे नाही. कोणीही रेव्हिन्यू अधिकारी किंवा गाव कामगार सा-याकरिता सक्ति करुं लागले तर लोकांनी त्यास सांगावे की, यंदा आमच्या गावात अकरा-बारा आणे पीक बुडले आहे म्हणून तूर्त सा-याची तहकूबी व पुढे माफी मिळाली पाहिजे.[२१]

एका बाजूला लोकमताचा चाप लावून दुसरीकडे टिळक सरकारला सतत पेचात पकडत होते. टिळकांचे दुष्काळातील सरकार संबंधाचे लेखन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कायद्याची मर्यादा न ओलांडता सरकारचे हेतु व निष्क्रियता उघडकीस आणणारे होते. दुष्काळाच्या सुरुवातीस टिळकांनी लिहिले होते, दुष्काळांत प्रजेचे राजाने संरक्षण केलेच पाहिजे. त्यातून आमच्या सरकारने शेतक-यांकडून (आमच्या) पैसे घेऊन दुष्काळाचा विमा उतरिला आहे. दुष्काळात सर्वांचेच जीव सरकारने बचाविले पाहिजेत व सरकारांस ही गोष्ट मान्य आहे, आमची लोकांना एवढीच सूचना आहे की, लोकांनी आता याबाबतीत सरकार जवळ विनाकारण भांडून काही उपयोग नाही, सरकार काय करणार हे सरकारनेच प्रसिध्द केले आहे. राने केव्हा मोकळी करावयाची, दुष्काळाप्रित्यर्थ लहान मोठी कामे केव्हा व कशी काढावयाची, फुकट अन्न कोणास द्यावयाचे, कोष्टी वगैरे कारागीरास लोकांस कशी मदत करावयाची, अनाथ मुलांची काय व्यवस्था करणार इत्यादी पुष्कळ गोष्टीबद्दल फॅमिन रिलीफ कोडमध्ये सरकारने नियम बांधून टाकिले आहेत.[२२]

याच वेळी टिळक लोकांच्या स्थानिक पुढा-यांनी दुष्काल निवारण्यासाठी काय करावे याचे मार्गदर्शन करीत होते. एका बाजूला नोकरशाही व दुस-या बाजूला अडाणी शेतकरी यांच्यामधील दुवा म्हणजेच लोकांचे पुढारी होत, त्यांनी धाडसाने पुढे येऊन लोकांची गा-हाणी सरकारपुढे मांडली पाहिजेत, हे सांगताना टिळक म्हणाले होते, "तालुक्यात चार आणि पीक असले की हयांनी आठ आणे रिपोर्ट केलाच, असल्या अधिका-यांच्या रयतेने बिलकुल भीड बाळगता कामा नये. आजचा प्रसंग पोटावरचा आहे हे नीट लक्षात ठेवा, व अशा वेळी जर तुम्हास हक्काने मिळण्यासरखी मदत तुम्ही मागून घेतली नाहीत तर तुम्ही जगलेत काय आणि मेलेत काय सारखेच असे इतर देशांतील लोक तुम्हास म्हणतील हेहि विसरु नका.

थोडक्यात दुष्काळातील हे दिवस गप्प बसण्याचे नव्हते. त्यांनी होईल तितकें करून रयतेस आपल्या हातून जी मदत होण्याजोगी असेल ती करण्यास मागे पुढे पाहू नये. दर एक गावात किंवा तालुक्यात कमिटी करून पुढा-यांनी करावयाची कामे बरीच आहेत व ती सर्व ✓ अशी आहेत की, सुशिक्षित लोकांच्या मदतीखेरीज ती गरीब रयतेस यावयाची नाहीत.[२३]

पुढा-यांनी करावयाच्या कामाची यादी देऊन टिळकांनी पुढे लिहिले होते, "ही कामे थोडीबहुत करण्याचा उद्योग करील त्यावर अधिका--याची थोडीबहुत गैरमर्जी होईल, काही अधिकारी फिर्याद करतील व काही ना यातून तुरुंगात जावे लागेल." तरी पण ठिकठिकाणच्या पुढा-यांनी या वेळी मनापासून झटलेच पाहिजे असे त्यांस आग्रहपूर्वक टिळकांनी सांगितले होते.[२४]

टिळकांनी या मोहिमेत अनेक सुशिक्षित पदवीधरांना सामील करून घेतले होते. फॅमिन कोडाचे मराठी भाषांतर करून ते गावोगाव वाटण्यासाठी व त्यातील तरतुदी शेतक-यांना समजावून सांगण्यासाठी ह्या तरुणांना त्यांनी सांगितले यामुळे शेतक-यांच्या दुःखाला व अडचणींना वाचा फुटली व सुशिक्षित लोकांना शेतक-यांच्या परिस्थितीची कल्पना आली. टिळक म्हणतात, फॅमिन रिलीफ कोड जितका सरकारी अधिका--याकरिता आहे तितकाच रयतेकरिता आहे व त्या कोडात जे हक्क अगर सवलती रयतेस घाव्या असे सांगितले आहे त्या मिळविण्यासाठी रयतेस उद्योग करावयास सांगणे हे प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचे कर्तव्य आहे.[२५]

शेवटी टिळक पुढा-यांना उद्देशून म्हणतात, "शेतकरी किंवा मजूर लोक अगदी अज्ञान व गरिब आहेत. त्यांच्या करिता खरा उद्योग

सुशिक्षित लोकांनीच केला पाहिजे व तो जर तालुक्यातील पुढारी लोक करणार नाहीत तर आपल्या देशाचे दुदैवच अद्याप संपले नाही असेच म्हणावे लागेल. दुष्काळामुळे पिके बुडाली, गुरे मरत चालली व लोक देशोधडीस लागून अन्नावाचून मरु लागले अशी परिस्थिती अनेक ठिकाणी आहे, अशा वेळी गरिब जनतेच्या साहाय्यासाठी पुढाऱ्यानी झटणे आवश्यक आहे.[२६]

थोडक्यात दुष्काळ निवारणाच्या संदर्भात तर त्यांनी सार्वजनिक सभेच्या वतीने गावोगाव प्रचारक पाठवून सरकारी निर्णयानुसार लोकांना कोणते हक्क प्राप्त झाले आहेत व ते त्यांनी कसे बजावले पाहिजेत यासंबंधी शेतकऱ्यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला.

दुष्काळावरती उपाय सांगताना त्यांनी दुष्काळानंतर लिहिलेल्या लेखात पुढील विचार व्यक्त केले होते. "दुष्काळासारख्या प्रसंगातून तरी शेतकऱ्यांचा हल्लीहून अधिक बचाव होणे शक्य आहे. हे उपाय योजनामुळे खर्च वाढेल परंतु त्यामुळे दुष्काळाचे पुष्कळच प्रमाण कमी होईल. या विशेष उपायांपैकी मुख्य एक उपाय म्हणजे पाटबंधारे बांधणे व विहिर वगैरे खणून जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करुन पिकास पाणी देणे व पर्जन्यावर हल्ली शेतकींचे असलेले अवलंबन कमी करणे.[२७]

२) शेतसारा:

ज्याप्रमाणे दुष्काळ ही शेतकऱ्यापुढील महत्त्वाची समस्या होती त्याचप्रमाणे शेतसारा हा देखील शेतकऱ्याच्या निकृष्ठ अवस्थेला कारणीभूत आहे. महाराष्ट्रात इंग्रजी राजवट स्थापन झाल्यानंतर शेतीसुधारणा करण्याच्या नावाखाली येथे रयतवादी पध्दत लागू केली यामध्ये

शेतसारा तीसतीस वर्षांसाठी कायम करण्यात आला होता. हा एकदा कायम केलेला शेतसारा पिके बुडाली अगर चांगली आली तरी त्यात फरक पडत नव्हता. टिळकांचे मते इंग्रजी राजवटी शेतक-यांशी दरिद्री होण्याची अनेक कारणे आहेत. त्यात शेतसारा हे एक महत्त्वाचे आहे. शेतसारा वरील आपले विचार केसरीतून व्यक्त करताना त्यांनी १८९२ मध्ये "हा सारा वाढविणे की जुलूम ? यातून आपले विचार व्यक्त केले. ते म्हणतात, "जमिनीचा सारा वाढविणे हा एक उत्पन्न वाढविण्याचा मार्ग आहे व जोपर्यंत जास्त सारा रयतेकडून निघत आहे तो पर्यंत सरकार आपण होऊन काही एक करण्यास प्रवृत्त होणार नाही. जमिनीच्या मालकास केवळ जमिन वाहणाराकडून जास्त कोणताही हक्क प्राप्त होत नाही व सर्व जमिनीची मालकी खुद्द सरकारकडेच आहे, हे तत्त्व जमिन महसुलाच्या कायद्यात अगदी गुपचूप व बेमालूम नमूद केले आहे, त्यामुळे सरकार मागेल तेवढा सारा देऊन पाहिजे तर जमिन वापरावी, नाही तर सोडून द्यावी अशी आमच्या शेतक-यांची स्थिती झाली आहे.[२८]

शेतसा-याच्या वाढीसंबंधी आणखी एका अग्रलेखात टिळकांनी लिहिले होते, ज्या गावात शेतकीवर उदरनिर्वाह करणारी पूर्वी दहा-दहा माणसांची पन्नास कुटुंबे किंवा पाचशे माणसे होती. तेथे आता जवळ जवळ त्याच्या दुप्पट माणसे झाली आहेत आणि जमिन कांही त्या प्रमाणाने वाढलेली किंवा सुधारलेली नाही. अशा स्थितीत सरकारने दर तीस वर्षांनी सा-याचे मान दुप्पट, तिप्पट किंबहुना पांच, सहापट वाढविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे पहिल्या मोजणीच्या चुका दुरुस्त करणे नव्हे, तर शेतक-यांनी आपल्या मेहनतीने आणि खर्चाने पहिल्या मोजणीनंतर जे उत्पादन वाढविले असेल ते सर्व त्यांच्या कडून हिसकावून घेऊन त्यांची दुर्दशा करण्यासारखे होय. पहिल्या मोजणीच्या

वेळी जमिनी वरकस लागल्या होत्या, त्यांची सुधारणा या मोजणीच्यावेळी त्यापैकी पुष्कळ शेतजमिनी झाल्या आहेत. पण ही सुधारणा ढगांतून पाऊस पडून किंवा सुर्याच्या उष्णतेने आपोआप घडून आलेली नाही, अथवा सरकारने कालवे, बंधारे बांधून किंवा अन्य तऱ्हेने मदत करुन घडवून आणलेली नाही. असे असता सरकारने फेर पाहणीच्या वेळी काही तरी सबबी लावून असल्या जमिनीवरील सारा वाढविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे गरीब लोकांनी पोटासाठी मेहनत करुन संचित केलेल्या द्रव्याचा अपहार करण्यासारखेच आहे. सरकारचे हे वर्तन अयोग्य आहे.

वरील प्रकारचा सारा वाढविण्यासाठी सरकारी नोकर अनेक प्रकारच्या युक्त्या योजून तो प्रत्येक ३० वर्षांनी वाढवतच होते. सारा वसुली विषयी लिहिताना टिळक म्हणतात, "पाऊस असो वा नसो, पीक येवो अगर न येवो, शेतकरी वत्यांची मुले माणसे उपाशी मरोत कोंवा तुरुंगात जावोत, शेतसारा नेमलेल्या तारखेच्या आत कचेरीत भरलाच पाहिजे.[३०]

थोडक्यात तत्कालीन शेतक-यांच्या परिस्थितीचे टिळकांनी केलेले वर्णन अत्यंत मार्मिक आहे. टिळक म्हणतात, "गरीब बिचारा कुणबी, ज्यास पूर्वी आपल्या गावात हवे ते करण्याची मोकळीक होती, त्यासच आता घराबाहेर पाऊल पडले म्हणजे मी कोणत्या खात्याच्या तडाक्यात सापडतो अशी धास्ती वाटू लागली आहे. निरनिराळया खात्यांचे मुख्य अधिकारी व त्यांच्या हाताखालील छोटया अधिका-यांच्या फलटणी यांस

आपले विचार रुचावयाचे नाहीत असे सर वेडरबर्नसाहेब यांनी स्पष्ट लिहिले आहे. पण सदर अधिका-यांच्या हितापेक्षा रयतेचे हित ज्या पध्दतीने होईल तीच पध्दत सरकारास स्वीकारली पाहिजे. एखाद्या आधाशी राजाप्रमाणे लोकांचे सर्व स्वातंत्र्य व अधिकार सरकारची निरनिराळी खाती पूर्णपणे बळकावून बसली आहेत. या राक्षसी खात्यांच्या जुलमांतून रयतेची सुटका होईल अशी योजना करणे हे विलायतेतील लोकांचे पहिले कर्तव्य आहे.[३१]

कर्जाचा बोजा डोईवर इतका की, घरदार, गुरेढोरे गहाण पडली तरी कसे जाईल याची चिंता" सरकारी सारा तर दरवर्षास तारखेच्या तारखेस भरला पाहिजे, नाहीतर जमिनीचा लिलाव होण्याची धास्ती, त्यात अवर्षण, टोळधाड वगैरे अवांतर अरिष्टे अलीकडे वरचेवर कृपादृष्टी होत असल्यामुळे दुष्काळ पडायचाच वर्षातून आठ महिने उपासमार सोसून केवळ पुढच्या हंगामाच्या आशेवर कसे तरी जीवन काढावे व शेवटी ऐनवेळी पावसाने दगा दिला म्हणजे शेतक-याला सावकारांच्या घरी जावे लागे अशी बिकट परिस्थिती शेतक-याची होती.

६) <u>शेतक-यांच्या दैन्यावस्थेची कारणे:</u>

इंग्रज राजवटीमध्ये दुष्काळ, शेतसारा, उद्योगधंद्याचा अभाव, जुन्या पध्दतीची शेतीव्यवस्था यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग अधिकच दरिद्री बनला होता. या शेतक-यांच्यापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. सरकारच्या सहानुभुतीशून्य धोरणामुळे त्याची उपासमार होत होती. याचबरोबर शेतक-याच्या दैन्यावस्थेला इतरही काही कारणे होती असे टिळक सांगतात. टिळकांच्या मते शेतकरी दरिद्री बनण्यास पुढील प्रमुख गोष्टीच कारणीभूत आहेत.

१) इंग्रजांचा साम्राज्यवाद:

टिळक म्हणतात केवळ स्वार्थ आणि भौतिक सुखांची हाव यातूनच इंग्रजानी आपले साम्राज्य भारतावर पसरविले आहे. त्यांना आमचे कल्याण वगैरे काही करावयाचे नसून स्वत:चे हित साधावयाचे आहे. भारतात त्यांनी ज्या काही सुधारणा केल्या त्या स्वत:च्या लुटीच्या सोयीसाठी केलेल्या आहेत. त्यांचा मुख्य हेतू हा आर्थिक शोषण हाच आहे. आर्थिक शोषणामुळेच शेतकरी अधिकच दरिद्री बनत गेला आहे. येथे इंग्रजांनी कोणतेही नवीन उद्योगधंदे सुरु केले नाहीत. पण येथे पूर्वापार चालत आलेले व्यवसाय ही अध्वस्त करुन टाकले. ब्रिटीश साम्राज्यशाही आणि त्याबरोबर होणारी लूट यामुळे देशाचा शेती व्यवसाय पूर्ण उध्वस्त झाला त्यामुळे जुनी ग्रामीण व्यवस्थाही विस्कटून गेली.[३२]

थोडक्यात इंग्रज साम्राज्यवाद्यांचे मुख्य लक्ष्य शेती उत्पन्न हे आहे, या उत्पन्नातून जास्तीत जास्त पैसा कसा मिळेल व शेतकरी गरीब कसा राहिल हेच आहे. त्याप्रमाणे अनेक मार्गाने शेतक-यांची पिळवणूक चालू आहे.

२) सरकारी पिळवणूक:

टिळकांच्या मते सरकारची पिळवणूक ही तर शेतक-यांच्या दारिद्र्याचे महत्त्वाचे कारण आहे. सरकार शेतक-यांची शेतसा-याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात लूट करते. याविषयी टिळकांनी आपल्या "केसरी" वर्तमान पत्राच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे. टिळक म्हणतात "सावकारांच्या त्रासापासून शेतक-यांचे रक्षण करण्याकरिता म्हणून

सरकारने शेतक-यांचा कायदा केला. पण त्यापासून उपयोग काही एक न होता ज्यांच्या हिताकरिता तो करण्यात आला त्या शेतक-यांचे दारिद्र्य वाढतच गेले. सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारने शेतपेढया काढल्या व स्वत:च सावकारी करण्यास सुरवात केली, तरी शेतक-यांच्या कर्जबाजारीपणा वाढत्या दिशेलाच आहे. इतकेच नाही, तर शेतक-यांचे दारिद्र्य कमी करण्याकरिता जो कायदा केला तोच उलटा त्यांना घातक होता.[33] म्हणूनच टिळक म्हणतात शेतक-यांच्या दैन्यावस्थेचे मुख्य कारण सावकारांचा जुलूम नसून सरकारचा कडकपणा होय. थोडक्यात सरकारने शेतक-यांची परिस्थिती सुधारण्यासाठी जे काही कायदे, कमिशन नेमून उपाय योजना सुचविल्या यामुळे शेतक-याच्या परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा फरक पडला नाही असे टिळकांचे मत होते.

टिळकांच्या मते या शिवाय शेतसारा हे शेतक-याच्या दैन्यावस्थेचे प्रमुख कारण आहे. त्याच्या आर्थिक शोषणाचे ते कारण होते. सा-यात केलेली वाढ केल्यामुळे तर त्यात भरच पडत गेली होती. टिळक याविषयी लिहितात, "इंग्रज सरकार तीस वर्षांनी पुन: पहाणी करीत हे त्यास ठाऊक नव्हते असे नाही, पण त्यापैकी एकासहि स्वप्नातसुध्दा असे वाटले नसेल. ही फेरपहाणी इतकी कडक व त्रासदायक होईल. कोठे कोणी विहीर वगैरे खोदल्यास अगर पाट काढला असल्यास फेरपहाणीत त्याचा सारा वाढेल, तर कोणासही वाईट वाटणार नाही. परंतु निव्वळ वरकस अगर डोंगराळ जमिनीचा सारा या पहाणीत दोन दोनशे-पट जास्त वाढतो त्यास काय म्हणावे.[34] सरकारने दर तीस वर्षांनी सा-याचे मान दुप्पट, तिप्पट किंबहुना पाचपट-सहापट वाढविण्याचा

प्रयत्न करणे म्हणजे पहिल्या मोजणीच्या चुका दुरुस्त करणे नव्हे, तर शेतक-यांनी आपल्या मेहनतीने आणि खर्चाने पहिल्या मोजणीनंतर जे उत्पन्न वाढविले असेल ते सर्व त्यांच्यापासून हिसकावून घेऊन त्यांची दुर्दशा करण्यासारखेच होय. जमिनीची सुधारणा करुन त्यात जितके जास्त पिक येईल तितके जमिनीपासून काढण्याची शेतक-याची स्वाभाविकच इच्छा असते. पहिल्या मोजणीच्या वेळी ज्या जमिनी वरकस लागल्या होत्या त्यांची सुधारणा होऊन या मोजणीच्या वेळी त्यापैकी पुष्कळ शेतजमिनी झालेल्या आहेत. पण ही सुधारणा ढगांतून पाऊस पडून किंवा सूर्याच्या उष्णतेने आपोआप घडून आणलेली नाही, असे असता सरकारने फेरपहाणीच्या वेळी काही तरी सबबी लावून असल्या जमिनी-वरील सारा वाढविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे गरिब लोकांनी पोटासाठी मेहनत करुन संचित केलेल्या द्रव्याचा अपहार करण्यासारखेच आहे.[३५] तसेच सरकारने निर्माण केलेल्या जंगल खात्यामुळे शेतक-यांना गुरे चारण्यासाठी जागा शिल्लक राहिली नाही त्याला मिळणारा लाकूड फाटा बंद झाला. त्यामुळे त्याचा दुय्यम व्यवसायही बंद पडला होता. अशा त-हेने सरकार शेतक-यास सर्व बाजूनी लुबाडत होते व त्याच्या अवनतीस कारणीभुत ठरले होते.

३) <u>नोकरशाही:</u>

शेतक-यांना लिहिता वाचता येत नाही या त्यांच्या अज्ञानाचा फायदा नोकरशाही मोठया प्रमाणावर घेत होती व त्यांची आर्थिक पिळवणूक केली जात होती असे टिळक म्हणतात. शेतक-याच्या कल्याणार्थ किंवा दुष्काळाच्या वेळी अनेक उपाय योजना सरकारकडून

केल्या जात होत्या त्या उपाय योजना शेतक-यांना माहित नसतात किंबहुना त्याना जाणून घेण्याइतके ज्ञान नसते. हया योजना नोकर-शाही मधल्या मध्येच कागद इकडचे तिकडे करुन तशाच पाडून ठेवते. तसेच नोकरशाही जनतेवर जुलूम करत ओती. दुष्काळ पडला असेल तर योग्य ती माहिती सरकारला दिली जात नव्हती. त्यामुळे दुष्काळात शेतक-याला अन्नावाचून मरावे लागते. ही नोकरशाही तालुक्यात चार आणे पीक असेल की आठ आणे रिपोर्ट करतात. त्यामुळे शेतक-याचा शेतसारा पिक नसताना सुध्दा वसूल केला जातो. तसेच ठराविक आणे पीक बुडाल्यास सा-याची तहकुबी अगर माफी मिळेल असे जे कायदे होते किंवा यासारखे काही कायदे होते ते ही नोकरशाही शेतक-यांना सांगतच नाही. त्यामुळे शेतक-याच्या भल्यासाठी केलेले कायदे हे त्याच्या सर्वनाशास कारणीभूत ठरतात. याशिवाय नोकर-शाहीमध्ये मोटया प्रमाणात लाच घेण्याची प्रवृत्ती निर्माण झाली यामुळे शेतक-याला कोणात्याही किरकोळ कामासाठी लाच द्यावी लागते, ते काम होवो अगर न होतो. हे लाच घेण्याचे प्रमाणे सर्व स्तरातील नोकरशाहीमध्ये कसे आहे याविषयी टिळक एक उदाहरण देतात, "आमच्या दुर्दैवाने म्हणा अगर सरकारच्या दुर्लक्षातेमुळे म्हणा क्रॉफर्डसाहे-बांनी सर्व महाराष्ट्रास किंबहुना इलाख्यासहि ग्रासून टाकिले होते. कोणी कोणास हंसावयास नको. पंतसचिव किंवा जंजिऱ्याचे नबाब ही बडी प्रकरणे एकीकडेच ठेविली तर स.ब. महादेव, वासुदेव बर्वे, सी.आय.ई. याजपासून तो अनंतभट पालंद्यापर्यंत आणि रा.ब. सावंत भानगांवकर, साबाजीराव वगैरे बडया कामदारापासून तो तहत कमिशनरच्या ऑफिसां-तील क्लार्कपर्यंत पारशी, ब्राह्मण, शेणवी, लिंगायत, मराठे, प्रभु, कुणबी, मुसलमान वगैरे सर्व जातींच्या व सर्व प्रकारच्या लोकांनी हात

साधले तसा आपला फायदा करून घेतला आहे.[३६]

थोडक्यात शेतक-यांची आडवणूक, कायद्याचा अर्थ समजून न सांगणे, लाच घेणे, त्याला अयोग्य प्रकारची वागणूक देणे इत्यादी मार्गाने नोकरशाही त्याच्या आर्थिक शोषणात सहभागी होते.

४) सावकार शाही:

इंग्रजी राजवटीमध्ये इंग्रजांच्या नव्या धोरणामुळे सावकारशाही पेशवाई पेक्षा मोठ्या प्रमाणात वाढली. दुष्काळ, सारामध्ये वाढ, लोकांचा शेतीवर वाढता बोजा इतर उद्योग धंद्याचा अभाव इत्यादी कारणामुळे शेतक-यास सावकारी कर्जाची आवश्यकता भासे आणि एकदा कूळ सावकाराच्या हातात गेले म्हणजे कोळयाच्या जाळयात पडलेल्या माशाची जशी स्थिती होते तद्वतच शेतक-याची परिस्थिती होते. "सावकार जबर व्याजाने पैसे कर्जाऊ देत आणि हमी म्हणून शेतक-यांच्या जमिनी लिहून घेत यामुळे मोठया प्रमाणावर शेतक-यांची त्यांच्या परंपरागत जमिनीवरून उचलबांगडी होऊ लागली. जमिनीचे हस्तांतरण प्रचंड वाटले.[३७] ब्रिटीश सत्तेनंतर ही सावकारांनी शेतक-यांचे आर्थिक शोषण केले.

५) भरमसाठ सरकारी खर्च:

शेतक-यांच्या दैनावस्थेचे आणखी एक कारण म्हणजे भरमसाठ सरकारी खर्च . टिळकांच्या मते इंग्रज सरकार त्यांच्या नोकरशाहीवर लष्करावर गरीब शेतक-यांच्या गाडग्या मडक्यातून गोळा केलेला पैसा अनावश्यक रित्या खर्च करित आहे. यामुळे प्रजा, जमिन व व्यापार उदिम

यांच्यावर कुठल्याहि प्रकारचा खर्च न झाल्यामुळे ते अगदी निसत्त्व झाले आहेत. या आर्थिक शोषणामुळे शेतक-यांच्या अवस्थेमध्ये काहीही बदल झालेला नाही. उलट अफु, गांजा, दारु असली निच व निंद्य व्यसने त्यांच्या पाठिस चिकटली आहेत.[३८]

६) शेतीवर सर्व बोजा:

शेतीवर सर्व बोजा पडला व इतर उद्योगधंद्याचा अभाव यामुळे ही शेतकरी अधिकच गरिब बनला याविषयी टिळक केसरीत लिहितात, "महाराष्ट्रातील बहुतेक चांगली जमिन हजारो वर्षांच्या लागवडीने निकस व नि:सत्त्व होत चालली आहे. राब, कव्हळा, शेणा वगैरे स्वताचे पदार्थ उत्तरोत्तर जंगलाच्या ऱ्हासाने आणि गायरानांच्या अभावाने दुर्मिळ होत चालले आहेत. देशातील लोकांनी परदेशगमन करावे तर तशी त्यास सवय नाही व सोयहि नाही, आणि इंग्रज सरकारच्या शांत अंमलाखाली लोकसंख्या उत्तरोत्तर झपाटयाने वाढत चालली आहे. व्यापारधंद्यात काही माणसे गुंतून राहिली असती, पण त्यातील किफायतीचा बहुतेक भाग परदेशस्थ लोकांनी उचलल्यामुळे तिकडूनहि काही तरणोपाय नाही, जवळ साठवलेली पुंजी होती नव्हती ती सर्व संपून केली.[३९] देशात चोहोकडे शांतता झाल्याने लोकसंख्या वाढली, युरोपियन व्यापा-यांच्या चढाओढीने इकडील व्यापारधंदे बसले आणि लष्करात पूर्वी जितक्या लोकांचा प्रवेश होत होता तितका आता होत नाही या सर्व कारणामुळे लोकांचा बोजा शेतीवरच पडला, मात्र जमिनीमध्ये वाढ झाली नाही. यामुळे शेतकरी अधिकच दरिद्री बनला.

वरील कारणामध्ये शेतक-याच्या दारिद्र्यास सरकारचे साम्राज्यवादी धोरणच कारणीभूत आहे. याविषयी सरकारने योग्य ते धोरण न आवलंबिल्यास त्याचा फार मोठा धोका निर्माण होईल असे टिळक म्हणतात. त्यासाठी त्यांनी केसरीमधून ह्यूम साहेब व इतरांची मते स्पष्टीकरणास्तव दिली आहेत. ह्यूम साहेब म्हणतात "हल्ली शेतक-यांची जी स्थिती आहे ती तशीच कायम राहिल्यास लवकरच ते बंड करण्यास उद्युक्त होतील व एकदा जागोजाग अशा रितीने दंगेधोपे होऊ लागले म्हणजे त्यात सरकार, जमीनदार, शिकलेले गृहस्थ वगैरे काही एक भेदाभेद न होता सर्वजण सारखेच बळी पडतील.[४०]

शेतक-यांच्या परिस्थितीविषयी लंडन मधील स्टेटसमन पत्रकात "गोविंद गुरु म्हणतात, "हिंदूस्थानातील शेतकरी लोक जर असेच दरिद्री राहून अन्नास मोताद होतील आणि कराचे ओझे प्रतिवर्षी नेहमी-प्रमाणेच वाढत जाईल तर त्यापासून हिंदूस्थानातील इंग्रजी राज्यावर लवकरच एखादे मोठे भयंकर संकट गुदरेल.[४१] स्पेक्टेटर नामक पत्राने ही १८७३ मध्ये असेच विचार व्यक्त केले होते."हिंदूस्थानात इंग्रजी राज्यास जर काही भय असेल तर ते शेतक-यांच्या अधिकाधिक निकृष्ट होत जाणा-या स्थितीपासूनच आहे."

थोडक्यात टिळक म्हणतात, "शेतकरी लोक दंगा करण्यास प्रवृत्त होण्याचे मुख्य कारण दारिद्र्य होय. कुटूंब वाढणे, व्यापारधंदा नाहीसा झाला, जमिनीत कस नसल्यामुळे ती नीकस होत चालली आणि पाऊसही वेळच्या वेळी पडत नाहीसा झाला यामुळे तो कर्जबाजारी बनतो.[४२] ही परिस्थिती कमी करण्यासाठी व शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी टिळक काही उपाय योजना ही सुचवितात.

धार

७) लो. टिळकांनी सूचविलेली उपाय योजना:

वरील प्रमाणे शेतक-याची झालेली दयनीय अवस्था सुधारणे आवश्यक आहे असे टिळकांना वाटते, शेती उत्पन्न वाढून त्यांना चांगल्या प्रकारचे जीवन जगता यावे, त्यांचे दारिद्र्य संपावे यासाठी ते पुढील उपाय योजना सांगतात.

अ) सरकारी धोरणातील बदल:

टिळकांच्या मते सरकारच्या हाती सत्ता असते तेंव्हा या सरकारने शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य ती उपाय योजना करावी, निरनिराळी उपाय योजून, सरकारी धोरण हे सहानभूतीचे ठेवावे. टिळक म्हणतात, "शेतक-याची खरी सुधारणा, म्हणजे त्यास शेतकीतून काढून जितके उद्योग धंदे मिळतील तितके मिळवून देणे, व शेतकीचीच जास्तीत जास्त सुधारणा करुन उत्पन्न वाढविणे होय. सरकारने शेतक-याला कमी व्याजाने पैसे मिळवून देणे, शेतीला पूरक उद्योगधंदे वाढविणे यासाठी सरकारने आपल्या धोरणात योग्य तो बदल घडवून आणावा. सा-याच्या बाबतीत सुध्दा सरकारने रयतवारी पध्दती ऐवजी कायमधारा पध्दती लागू करावी, योग्य तेवढाच शेतसारा घ्यावा त्यासाठी अधिका-यांना सूचना द्याव्यात. शेतसारा दामदुप्पटीने वाढवू नये. टिळक दुष्काळावर मात करण्यासाठी उपाय सुचवताना सांगतात, "शेतीला नियमित पाणी कसे मिळेल ही शेतक-याची काळजी सरकारने दूर करावी, यासाठी सरकारने मोठया प्रमाणात पाटबंधारे बांधावे, त्याचप्रमाणे विहिरी वगैरे खणून पिकास पाण्याचा पुरवठा अबाधित होईल असे करुन पर्जन्यावर शेतीचे असलेले अवलंबन कमी करणे. सरकारने

लँड रेव्हेन्यू कोड दुरुस्त करून जमिनीवर शेतक-याची जी उपरी कुळ म्हणून जी स्थिती होईल ती करु नये यामध्ये बदल करावा, शेतकरी हा जमिनीचा मालकच राहिला पाहिजे. १८७५-७६ साली सावकारांच्या छळास कंटाळून शेतक-यांनी एक बंड केले होते. त्यावेळी सरकारने कारणे शोधण्यासाठी एक कमिशन नेमले होते त्या कमिशनने अनेक उपाय योजना सुचविलेल्या होत्या त्यापैकीएक शेतसाराच मुख्यत्वे-करून लोकांच्या दैन्यास कारण आहे व म्हणून तो कायमचा ठरवून न टाकता रयतेच्या ऐपतीप्रमाणे घ्यावा[४३] ही उपाय योजना सरकारने अंमलात आणावी यासाठी सरकारने आपला दृष्टीकोण बदलावा.

टिळक केसरीमध्ये लिहितात, "शेतक-यास लिहिता वाचता येऊन त्यास आपल्या ख-या स्थितीचे ज्ञान व्हावे, त्याजजवळ जे काही पैसा दोन पैसे शिल्लक रहात असतील ते व्यवस्थेने राखून ठेवण्याची त्यास सोय असावी, आणि जमिनीचे हात-हातभर तुकडे होऊन कोणासहि आपल्या हिश्शाची योग्य किंमत मिळू नये अशी स्थिती न येण्याबद्दल सरकारने आपल्या धोरणात योग्य ते बदल करावेत.

ब) <u>शेतक-यांच्यामध्ये त्यांच्या अधिकाराबाबत जागृती:</u>

टिळकांच्या मते शेतक-याच्या अज्ञानामुळे त्याची अनेक ठिकाणी फसवणूक होती. सरकार काही गोष्टी त्याला देऊन करते पण त्याच्या अज्ञानामुळे त्या त्याला घेता येत नाहीत. यासाठी त्याला शिक्षण देऊन त्याच्यामध्ये जागृती घडवून आणली पाहिजे. टिळक याविषयी म्हणतात, "दुष्काळात जमिनी जरी खालसा झाल्या

असल्या तरी चौकशी करुन केवळ ऐपत नसल्यामुळे ज्यांच्या जमिनी खालसा झाल्या आहेत त्यास या सा-याची सूट देऊन किंवा दोनचार वर्षात भरण्याची सवलत देऊन पुन: त्या जमिनी त्यांजकडेच चालविण्या-बद्दल सरकारला सांगण्यासाठी त्यांच्यामध्ये जागृती करणे, दुष्काळ निवारण्यासाठी जी सर्क्युलर निघाली आहेत त्यामध्ये दुष्काळाच्या ठिकाणी सारा माफ करु असे स्पष्टच अभिवचन आहे. ती शेतक-याला समजावून सांगून त्याला हे हक्क मिळविण्यासाठी जागृत करणे.[४४] फॅमिन रिलीफ कोडात अनेक तरतूदी केल्या आहेत. त्यामध्ये कारागिराकरिता त्यांच्या धंद्याच्या कामगि-या काढणे, तगाई देणे, सा-याची तहकूबी अगर माफी करणे, जंगले मोकळी करणे, हलक्या पगाराच्या लोकांस महागाई देणे[४५] वगैरे जे नियम प्रसिध्द झाले आहेत त्याचा शेतक-याच्या मध्ये प्रसार करुन ते उपभागण्यास त्यांच्यामध्ये जागृती घडवून आणावी. या संदर्भात टिळक म्हणतात, "हे राज्य कायदयाचे आहे, दांडगाईचे नव्हे, भांडण झाले तरी कायदेशीर भांडावयास पाहिजे, तसे आपण भांडू तेंव्हाच आपणास हक्क मिळतील." टिळकांच्या मते शेतक-याच्या-मध्ये पुढा-यानी जागृती करावी एवढेच नव्हे तर हे हक्क अज्ञानी शेतक--यांना मिळवून देण्यासाठी त्यांच्या हक्कांची त्यांना जाणीव करुन देण्यासाठी राजकीय चळवळ करावी.

क) शेती सुधारणा व धंदे शिक्षण:

शेतक-याची दरिद्री अवस्था सुधारणे व शेतीवर वाढणारा बोजा कमी करावयाचा असेल तर टिळक म्हणतात शेती सुधारणा व धंदेशिक्षण यामध्ये प्रगती केली पाहिजे. शेतीमध्ये शास्त्रीय पध्दतीने पिके काढली पाहिजेत, शेतक-यांना आधुनिकशेती विषयी

शिक्षण दिले पाहिजे. शेती ही पावसावर अवलंबून न ठेवता त्यासाठी पाटबंधारे व विहीरी काढल्या पाहिजेत शेतकरी पेढ्या काढून त्यांना कमी व्याजाने कर्ज पुरवठा केला पाहिजे इत्यादी उपाय शेती सुधारणेसाठी केले पाहिजेत.

शेतीवरचा वाढता बोजा कमी करण्यासाठी त्यांनी धंदे शिक्षण महत्त्वाचे मानले. कापड धंदा व साखर कारखाने यांचे आधुनिक तंत्र आपण मिळविले पाहिजे, मोठे व लहान उद्योग यांच्या तांत्रीक गरजा वेगळया असल्या, तरी पण दोन्हीच्या गरजा भागविणारे तांत्रिक शिक्षण मिळाले पाहिजे, पिढीजात धंद्याचे आधुनिकीकरण झाले पाहिजे. टिळक याविषयी लिहितात, "हिंदुस्थाना देशात पूर्वी जे जिन्नस तयार होत होते ते बहुतेक सर्व आता परदेशातून येऊ लागले आहेत, आणि ते परदेशात ज्या पध्दतीने तयार होतात त्या पध्दतीचे ज्ञान आमच्या कारागिरांस झाल्याखेरीज आमच्या देशातील धंदे पुन्हा कधीहि उर्जितावस्थेला यावयाचे नाहीत. तसेच प्रथम देशाची औद्योगिकदृष्टया पहाणी केली पाहिजे, हे सांगताना टिळकांनी म्हटले होते, "देशातील कच्चा माल बाहेर किती व कोणात्या प्रकारे जातो आणि तिकडे त्याचे कोणात्या प्रकारचे रुपातंर होऊन तो आपल्या देशात परत येतो याची पहिल्याने पुरी चौकशी झाली पाहिजे. अशी चौकशी झाल्याखेरीज कोणात्या ठिकाणी कोणता नवा धंदा करता येईल हे सांगता यावयाचे नाही. कोणात्या प्रांतात किंवा जिल्हयात कोणात्या प्रकारचा कच्चा माल तयार होतो किंवा मिळतो व त्याचे काय काय पदार्थ तयार करता येतात, याची पहाणी सरकारने

आधी केली पाहिजे."[४६] याशिवाय धंदेशिक्षणाला सुरवात होणार नाही. टिळक यासाठी जपानचे उदाहरण देऊन त्या प्रमाणे येथेही धंदे शिक्षण घावे असे सरकारला सुचवतात. टिळकांच्या मते पोलीसांची सुधारणा करण्याकरिता जो पैसा खर्च करावयाचा त्या पेक्षा तोच पैसा उद्योगधंद्याच्या उत्तेजनास लावला तर तयापासून देशांतील लोकांचे अधिक हित होईल.

ड) सावकार शाहीवर माफक नियंत्रणे:

शेतक-यांच्या स्थिती मध्ये सुधारणा करण्यासाठी सावकारावर सरकारने माफक नियंत्रणे घालावीत असे टिळक सुचवितात. सावकार शेतक-यांना अडीअडचणीच्या वेळी ताबडतोब कर्ज देतात, मात्र सरकार शेतक-याच्या कर्जबाजारीपणास सावकारास दोष देऊन १८७९ च्या कायद्या सारखे कायदे करुन अनेक नियंत्रणे घालण्याचा प्रयत्न करत होते परंतु टिळक म्हणतात शेतक-याच्या परिस्थितीमध्ये फरक पडत नाही तो कर्जासाठी सावकाराकडे जातोच. टिळक या विषयी लिहितात, "वस्तुत: सावकारावाचून रयतेचे चालावयाचे नाही. शेतकीस लागणारे भांडवल तो पुरवितो, पण कर्जदार बुडाला कि बुडालाच इतकेच नाही तर ते भांडवलहि पुष्कळदा त्याचे नसून त्याने दुस-या मोठ्या पेढीवरुन आणलेले असते. शेतकरी एखाद्या वेळेस सुटून जातो, पण तो मात्र मध्येच बुडतो."[४७] थोडक्यात सावकार शेतक-याला शेतसारा किंवा दुष्काळ यासारख्या महत्त्वाच्या अडचणीच्या वेळी उपयोगी येतो म्हणून त्याच्यावर सरकारने माफक नियंत्रणे घालावीत. तो सदासर्वकाळ शेतक-यांचा वैरी आहे अशी समजूत सरकारने त्यांची करुन दिली होती.

ई) शेती आणि उद्योग यांच्यात परस्पर संबंध गरजेचे:

शेती आणि उद्योग यांच्या परस्पर संबंधातून कृषि औद्योगिक समाज निर्माण करण्याचा एक उपाय सांगतात ते म्हणतात जमिनीचे उत्पन्न

कुटूंबास पुरेसे नसते आणि दुसरा उद्योगधंदा पहावा तर तोहि इंग्रजी राज्यात नाहींसा झालेला तेंव्हा सावकाराचे घर पहाणे त्यास जरुर येते व अखेरीस आपणास प्रिय असलेली जमिनही विकावी लागते. या संकटातून त्यास सोडवावे अशी खरोखर ज्यांची इच्छा असेल त्यांनी देशातील उद्योगधंद्याची वृध्दि करुन गरीब लोकांस जिकडून मजूरी जास्त मिळेल अशी तजवीज केली पाहिजे.[४८] अशा प्रकारचा कृषी औद्योगिक समाज निर्माण करण्यासाठी काय करावयास पाहिजे याविषयी ते लिहितात. -आमच्या कारागिरांत व सावकारांत त्यांच्या त्यांच्या धंद्याचे ज्ञान वृध्दिगंत झाले पाहिजे. आम्हास परदेशात देखील पेढया स्थापन कराव्या लागतील. जपानने तसे केले आहे. नव्या कल्पना, नवे शोध यांचे आपण पूर्ण ज्ञान संपादन करुन त्याचा लाभ आमच्या देशाला करुन दिला पाहिजे. ज्या ठिकाणी व्यवस्थितपणे कारखाने निघून चालण्यास अडचणी येण्यासारखे नसतात, अशा ठिकाणाच्या कारखान्यात भांडवल गुंतविण्यास मागेपुढे पाहू नका.[४९]

थोडक्यात शेतीवरील उपाय योजने विषयी एका लेखकात टिळक म्हणतात, "शेतीसंबंधीचे शिक्षण लोकांना मिळाले पाहिजे. शिक्षणाशिवाय शेतीमध्ये सुधारणा होणार नाहीत, शेतीमध्ये कोणत्या प्रकारचे पिके घेणे हे कायदेशीर आहे हे अनुभवाने व शक्य तिथे कृतीने शेतक-यांना सरकारने करुन दाखवावे, शेतीमध्ये शास्त्रीय पध्दतीने सुधारणा करुन पिकामध्ये बदल करावेत व यासाठी पीक वाढविण्याचे मार्ग वगैरे सर्व काही ज्या शाळांतून सप्रयोग आणि सशास्त्र शिकविले जाईल अशी इलाख्यात एक मोठी आणि सर्व इलाखभर, लहान लहान शाळा काढाव्यात. महाराष्ट्रात लांब धाग्याचा कापूस निर्माण

करावा तसेच ऊसाची लागवड करून त्याचे कारखानेही येथेच काढावेत. शेतींची सुधारणा म्हणजे नुसती पिकांची नव्हे तर त्या पिकापासून पुढे जो माल तयार होतो तो माल तयार करण्याचे कारखाने या देशात निघाले पाहिजेत. याशिवाय सरकारने पाटबंधारे बांधणे त्यासाठी जास्त पैसे खर्च करावेत यामध्ये नफा तोटा याचा विचार करु नये. अधिकारी वर्ग व शेतकरी यांच्यामध्ये सहानुभूती निर्माण करावी, शेतकी खात्याची रचना ही रेव्हिन्यू, ज्युडिशियल किंवा पोलीस खात्याहून वेगळी करावी."[५०]

थोडक्यात टिळकांच्या मते वरील प्रमाणे उपाययोजना केल्यास शेतकऱ्यांचे दारिद्र्य अवस्था कमी होऊन त्यांची सर्वांगीण परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. त्याला दोन वेळ पोटभर अन्न मिळेल तसेच तो शेतसारा व दुष्काळ यांना तोंड देऊ शकेल.

## ८) शेतीसुधारणा व तत्कालीन राजकारण:

टिळक हे राजकारणी नेते होते त्यामुळे त्यांचा प्रत्येक निष्कर्ष हा राजकारणाशी निगडीत हा असणारच व राजकारण म्हणजे बहुमताचा प्रश्न यासाठीच टिळक म्हणतात. कोणत्याही राजकीय चळवळीचे यश हे मूठभर सुशिक्षिताऐवजी सर्व सामान्य जनतेच्या पाठिंब्यावर व प्रतिकार शक्तीवरच अवलंबून असते. म्हणूनच राष्ट्रीय चळवळीचे सामर्थ्य वाढविण्यासाठी शेतकरी समाजाला तिच्यामध्ये सामील करून घेणे आवश्यक होते. "रयतेच्या गरजा इंग्रजलोकांपेक्षा आम्हास अधिक चांगल्या रीतीने कळतात हे खरे असले, तरी ते तोंडाने सांगितल्याने काही उपयोग होत नाही. रयतेची दु:खे रयतेनेच येऊन सभेत सांगितली पाहिजेत. किंवा निदान ज्यांच्या दु:खाबद्दल सरकारशी आम्ही दाद मागतो ते लोक असल्या सभेस हजर तरी असले पाहिजेत.[५१] अशा विचाराने त्यांनी प्रांतीक सभेत शेतकऱ्यांनाआणण्याचे किंवा सारा तहकुबीसाठी त्यांच्या

खास सभा भरविण्याचे प्रयत्न केले.

टिळक हे इंग्रजी राजवटीविरुध्द संघटीत लढा देऊ इच्छित होते. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात दुष्काळासारखा प्रश्न हाती घेऊन समाजामधील जवळ जवळ ८०% समाज या समाजाला संघटीत करुन त्यांनी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र हे सर्व प्रयत्न त्यांनी राष्ट्रीय पातळीवरुन केले. संघटीत प्रयत्नाच्याद्वारे त्यांनी सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करुन शेतक-याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

सरकार व साम्राज्यवादी नोकरशाही हे शेतक-यांचे शत्रु आहेत अशी भावना त्यानी शेतक-याच्या मनामध्ये निर्माण करुन त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला व त्यांना सरकारविरुध्द संघटित करुन त्यांचे प्रश्न राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरुन सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. शेतीमध्ये आधुनिक पध्दतीने सुधारणा करणे, जपानच्या तंत्रज्ञाना सारखा भारतामध्येही उपयोग करणे, धंदे शिक्षण विषयक शिक्षण देणे, पाटबंधारे बांधणे इत्यादी सुधारणा करण्यासाठी त्यांनी सरकारवर दबाव आणला. स्वराज्य मिळविणे हे टिळकांचे ध्येय होते. यासाठी सुध्दा त्यांनी शेतक-याना संघटित करुन दुहेरी उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न केला.

९) लो. टिळक व शेतीप्रश्न टीकात्मक विचार:

लो. टिळकांचे आर्थिक प्रश्नांचे विवेचन हे त्यांच्या राजकीय कर्तृत्वाशी व राजकीय विचारांशी मिळते जुळते आहे. आजचे सगळे क्रियाशील राजकारण हे प्राय: आर्थिक समस्याभोवती फिरत असते.

राजकीय धोरण व तत्सम बाबी या आर्थिक जीवनाला प्राधान्य देऊन त्यावर आधारलेल्या असतात. टिळकांच्यावेळी हीच परिस्थिती होती. पण ब्रिटीशांचे राज्य पक्केपणी स्थिर झाले होते. व राज्यकर्त्यांचे अर्थसंबंध प्रथम व सदैव जपणे हे त्या सरकारचे धोरण होते. भारतीयांस केवळ आपण गरिब होत चाललो आहोत, शेतक-यांचे जीवन असहय आहे, अद्योग धंद्याची वाढ नाही. इत्यादी बाबत फक्त असंतोष व्यक्त करता येत होता. आपल्या आर्थिक गा-हाण्यांच्या निराकरणासाठी राजकीय चळवळ उभी करणे ही बाब दूर होते. ही चळवळ टिळकांनी केली.

इंग्रज सरकार व शेतक-यांचे प्रश्न हा टिळकांच्या आर्थिक लेखनाचा महत्त्वाचा विषय होता. पण त्याला राजकीय असंतोषाची धार देण्याचा शेतक-यांना स्वतःच्या हक्कासाठी संघटित करण्याचा प्रयत्न टिळकांनी केला. यासाठी त्यांनी दुष्काळ व सारा यावर संघटीत करून ब्रिटीश राज्याविषयी शेतक-यांच्या मनामध्ये प्रक्षोभ निर्माण केला. टिळकांच्या मते शेतकरी दरिद्र्य बनण्यास शेतक-याविषयी सरकारची असलेली उदासिनता हेच एक महत्त्वाचे कारण आहे, सरकार शेतक-याचे साराच्या व इतर फंडाच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर आर्थिक शोषण करतो. दुष्काळा-मध्ये तर त्याला खायला अन्न सुध्दा मिळत नाही. परंतु सरकार त्याची काळजी करत नाही. दुष्काळाची, शेतक-याची आर्थिक परिस्थिती चौकशी न करता सरकार सावकारशाहीलाच दोष देऊन त्यांच्यावर कडक नियंत्रणे लादते. सावकारावरती अशा प्रकारची नियंत्रणे लादली तर शेतक-यांना दुष्काळाच्या वेळी व शेतसा-याच्या वेळी मदत कोण करणार ? टिळक म्हणतात शेतक-याच्यासाठी काही कायदे करण्याचे नाटक सरकारने केले असले तरी त्याचा फायदा त्यांना होण्याऐवजी ते अधिकच कर्जबाजारी बनले. याविषयी टिळक म्हणतात, "हिंदुस्थानातील शेतकरी

लोक गळयाइतके सावकाराच्या कर्जात बुडालेले असतात, यात काहीच आश्चर्य नाही. लढाया बंद झाल्या, महामारी सारख्या भयंकर रोगांच्या साथी कमी कमी होत चालल्या म्हणजे लोकसंख्येचे मान असेच वाढत जाऊन अखेरीस राष्ट्रास दारिद्र्य व दुर्दशा यावयाची[५२] आणि यावर सरकार कोणत्याही प्रकारचे उपाय योजित नाही त्याऐवजी शेतक-यांची लुटच करत आहे. थोडक्यात टिळक म्हणतात, इंग्रज सरकारचे धोरण हे साम्राज्यशाहीचे आहे. त्यामुळे त्यांचे धोरण हे पिळवणूकीचेच असणार, शेतक-याच्या दारिद्री अवस्थेत सरकार व साम्राज्यशाही नोकरशाहीच आहे. किंबहुना शेतक-याला त्याच्या अवनतीस सरकारच कारणीभूत आहे हे पटवून देतात व शेतक-याची मते ब्रिटिश राज्याविषयी अस्वस्थ करतात. कोणताही प्रश्न निवडताना त्यातील प्रक्षोभकता ते जोखीत. सरकारीधोरणाचा काळजीपूर्वक अभ्यास करुन त्यातील अधू अंगे शोधून त्याच्यावर चौफेर हल्ला टिळक करीत होते. कोणत्याही लहानशा, क्षुल्लक वाटणा-या शेतक-याच्या प्रश्नाचे ते राजकीय भांडवल करुन शेतक-यांना सरकार विरुध्द संघटित करित होते. यासाठी मागे त्यांचा स्वराज्य मिळविणे हा हेतु होता. यासाठी ते समाजातील सर्वात मोठया वर्गाचा पाठिंबा मिळवण्यासाठीच ते शेतक-याच्या प्रश्नाकडे वळले होते. हे टिळक यांच्या विचारावरुन स्पष्ट होईल. ते केसरीत याविषयी पुढीलप्रमाणे मत व्यक्त करतात, "हल्लीचे मोठे संकट गाढ दारिद्र्य आहे, त्यातून सुटण्याचा उपाय सांगणे हे हल्लीचे मुख्य कर्तव्य आहे. हे दारिद्र्य, उपासमार काढून टाकण्यासाठी स्वदेशी चळवळ सुरु झाली आहे. आमच्या देशाला विघातक असे जे सरकारचे धोरण आज अनेक वर्षापासून या देशात चालू आहे याची प्रगति अडविणे हे स्वदेशीचे मुख्य काम होय. हे एक शास्त्र आहे. आजची स्वदेशी

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

चळवळ अधिक व्यापक आहे, फक्त मांचेस्टरची धोतरे बंद करण्यापुरती आजची चळवळ नाही तर आम्हास गो-यांचे सर्व हक्क मिळावेत व त्यांनी ते न दिल्यास त्याजकडून आम्ही अडवून घ्यावे म्हणून आजची स्वदेशी चळवळ निघालेली आहे. आमच्या जुन्या नव्या उद्योगधंद्याना जर कायमचे भूर्जित स्वरूप यावयाचे असेल तर कर बसविणे, वसूल करणे व खर्च करणे वगैरे काही बाबी आपल्या हाती ब-याच अंशाने आल्याखेरीज तसे होणे शक्य नाही.[५३]

शेतक-यांच्या उन्नतीसंबंधी टिळकांनीक काही लेख लिहिले असलेले, सरकारच्या विरुध्द शेतक-यांना संघटित केले असले, त्यांचे प्रश्न सोडवून घेण्याचा प्रयत्न केला असला तरीही शेतक-याच्या आर्थिक शोषणास सर्वस्वी जबाबदार टिळकांनी सरकारला धरलेयात त्यांचा एकांगीपणाच दिसून येतो, आपला राजकीय शत्रु हीच त्या पाठीमागे टिळकांची भूमिका दिसून येते. कारण ज्या ज्या वेळी सरकारने शेतक-यांच्या स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून सरकार प्रयत्नकरी त्यात्या वेळेला श्रीमंतांची व जमीनदारांची बाजू घेऊन सरकारशी भांडत[५४] टिळक शेतक-यांची बाजू घेत तेव्हा त्यांच्या लेखांना नि भाषणांचा सूर असा असे की, शेतक-याच्या कर्जबाजारी अवस्थेला केवळ सरकार कारणीभूत आहे. सावकार वा जमीनदार हे त्या विपन्नावस्थेला किती जाबाबदार आहेत, हे त्यानी कधीच स्पष्टपणे वा निर्भयपणे सांगितले नाही. सावकार जमीनदार व शेतकरीत्यांना ब्रिटिश राजवटीविरुध्द उठवणे हेच त्यांचे प्रमुख उद्दिष्ट्ये दिसून येते.

सावकार किंवा जमीनदार यांच्यापासून शेतक-याच्या जमिनीचे रक्षण व्हावे म्हणून एक विधेयक विधि मंडळात मुंबई सरकारने १९०१ साली विचारासाठी ठेवले त्याविरुध्द सावकारांनी मोर्चा काढला,

टिळकांनी त्या विधेयकाविरुध्द लेख लिहिले, गोखले, मेथादी नेते त्या विधेयाकाविरुध्द सभात्याग करुन विधिमंडळाबाहेर पडले म्हणून टिळकांनी त्यांचे अभिनंदन केले आणि सरकारची मर्मभेदक थट्टा केली. ५२ म्हणजेच ज्याप्रमाणे सामाजिक क्षेत्रात सनातन्यांची बाजू घेतली त्याचप्रमाणे आर्थिक जीवनातही त्यांनी प्रनय: वरिष्ठ वर्गाची कड घेतली. या विषयी ते सावकाराची बाजू घेऊन म्हणतात, रयतेच्या सर्व अरिष्टाला कारण सावकार अशी पुष्कळांची समजूत असल्यामुळे त्याची कोणाला कीव येत नाही, पण ही चूक आहे. वस्तुत: सावकारावाचून रयतेचे चालावयाचेच नाही, शेतीस लागणारे भांडवल तो पुरवितो, पण कर्जदार बुडाला की तो बुडालाच. इतकेच नाही तर ते भांडवलहि पुष्कळदा त्याचे नसून त्याने दुस-या मोठया पेढीवरुन आणलेले असते. शेतकरी एखादे वेळीस सुटून जातो पण तो मात्र मध्येच बुडतो. हल्ली सरकारच्या आचरणाने रयत व सावकार हयांच्यामध्ये विनाकारण द्वैतभाव उत्पन्न झाले आहे. तसा तो राहाण्याचे कारण नाही.५५ असे प्रतिपादन करुन शेतकरी व सावकार यांच्यातील तंटयाबद्दल सरकारला जबाबदार धरुन सावकारला दोषमुक्त करण्याकडे टिळकांचा कल होता.

मात्र सरकारच्या भेदनीतीमुळे वर्ग समन्वयाचे हे धोरण सांभाळणे जेंव्हा अशक्य झाले तेंव्हा मालकी हक्कांचे समर्थन करुन त्यांनी नि:शंकपणे वरिष्ट वर्गाचीच बाजू घेतली. पुण्यातील पहिल्या चिमणीचे अभिनंदन करुन कारखानदारीच्या उपक्रमास त्यांनी आशिर्वाद दिला पण त्याच वेळी १८९१ च्या कामगार कायद्याबद्दल मात्र नापसंती व्यक्त केली. वास्तविक पाहता या कायद्याने आठवडयातून एक दिवसाची रजा आणि स्त्रिया व नऊ वर्षाखालील मुले यांचे अतिश्रमापासून संरक्षण या व्यतिरिक्त कोणत्याहि सवलती मजुरांना मिळाल्या नव्हत्या. तरी देखील टिळकांनी कारखानदारांचा पक्ष उचलून धरला. कामगारांच्या हिताची व हक्काची फिकीर केली नाही.

थोडक्यात टिळकांनी शेतक-याच्या दारिद्र्यास सर्वत: सरकारलाच कारणीभूत धरले आहे हे समर्थनीय नाही, सावकार, नोकरशाही, जमीनदार हे सुध्दा शेतक-यांचे आर्थिक शोषण करित होतेच. टिळकांना शेतक-यांच्या आर्थिक प्रश्नापेक्षा राजकीय चळवळ महत्त्वाची वाटत होती. आणि या चळवळीला सार्वत्रिक पाठिंबा मिळावा म्हणून सरकार शिवाय इतर सर्व घटकांना त्यांनी त्यात ओढण्याचा प्रयत्न केला. कारण वरिष्ठ वर्गांना सांभाळून घेणारे वर्ग समन्वयाचे राजकारण हा त्यांच्या शेती धोरणाचा गाभा होता.

टिळकांच्या या मर्यादा लक्षात घेतल्या तरी त्यांनी शेती प्रश्नाचा त्या काळात बराच व्यापक विचार केला होता. शेतसारा, वासाहतिक समाजातील साम्राज्यशाही पिळवणूक, भ्रष्ट व लाचखाऊ नोकरशाही व त्याविरुध्द त्यांनी सुचविलेले राजकीय जागृतीचे व चळवळीचे उपाय आजही महत्त्वाचे आहेत. धंदे शिक्षण उद्योग व शेती यातील संबंध आणि कृषिवर आधारित उद्योगधंदे स्थापिणे या बाबतचे त्यांचे विचार त्यांची दूरदृष्टी दाखवून देतात.

.....

## - संदर्भ -


१) W. Wedderburn, Allan octavian Hume P-17

२) कीर धनंजय लोकमान्य टिळक राजर्षी शाहुम महाराज - एक मूल्यमापन श्री गजानन बुक डोपो, प्रकाशन, मुंबई-२८, १९७१, पृ. ६-७.

३) कीर धनंजय लोकमान्य टिळक आवृत्ती-२, सन १९६५ पृ. १०-११

४) पंडित नलिनी महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास नलिनी पंडित, बांबुली निवास, माहीम मुंबई-१६, प्र.आ.१९५५ पृ.९८

५) केळकर भा.कृ. टिळक विचार, श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे ३०, मार्च,८१, पृ.१७८.

६) पारीख गोवर्धन भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार, बाळगंगाधर टिळक मौजे प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई-४ जुलै, १९६९, पृ. ३४.

७) उक्त पृ. ३७

८) केसरी दिनांक १५ जून, १८९७.

९) Cited in Wolpert, Tilak & Gokhale, California 1962 P-74

१०) Tilak - Writings & speeches, Madras, 1918, P-234

११) टिळक बा.गं. गीता रहस्य पृ. ३९९.

१२) Tilak, Speeches & Writtings P-354

१३) The Maratha, 13 December, 1919

१४) Bal Gangadhar Tilak - His writings & speeches Enlarged Ed., Ganesh Co, Madras, P-55

१५) समग्र लोकमान्य टिळक खंड-३, केसरी प्रकाशन पुणे, प्रथम आ.१९७६
पृ. ३७४.

१६) उक्त पृ. ३१५

१७) समग्र लोक मान्य टिळक खंड ६ पृ. ७३९.

१८) लोकमान्य टिळक लेखसंग्रह (संपा.) तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री-जोशी
आवृत्ती १, साहित्य अकेडेमी नवी दिल्ली, सन१९६९
प्रस्तावना पृ. २८.

१९) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, पृ. ४४६.

२०) केसरी २० आक्टोबर, १८९६

२१) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, पृ. ४७४

२२) उक्त पृ. ४३९-४४०

२३) उक्त पृ. ४७१

२४) उक्त पृ. ४७२

२५) समग्र लोकमान्य टिळक खंड-३, पृ. ४७७

२६) उक्त पृ. ४७०-७१

२७) केसरी १९ नोव्हेंबर, १९०१

२८) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, पृ. २८८

२९) उक्त पृ. ३०८

३०) उक्त पृ. २८३

३१) समग्र लो. टिळक खंड-१, पृ. १५८-१५९

३२) लोकमान्य टिळक लोक संग्राह पृ. १७८

३३) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, पृ. २८४

३४) उक्त पृ. २८८

३५) उक्त पृ. ३०८-३०९

३६) उक्त पृ. ७४८

३७) L. Natrajan, Peasant uprising in India, P-54.

३८) लोकमान्य टिळक यांचे केसरीतील लेख भाग-१, पृ.६७-६८

३९) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, पृ. २९२

४०) उक्त पृ. २९०

४१) उक्त पृ. २९७

४२) उक्त पृ. ३०२

४३) उक्त पृ. २८५

४४) उक्त पृ. ३२३

४५) उक्त पृ. ४५३

४६) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, पृ. २०८-२०९

४७) उक्त पृ. २८६

४८) उक्त पृ. ३१७

४९) समग्र लोकमान्य टिळक खंड ६ पृ. ६२० व ६२२

५०) समग्र लोकमान्य टिळक खंड ३ पृ. ३८०-८३

५१) समग्र लोकमान्य टिळक खंड १ पृ. ५३६

५२) समग्र लोकमान्य टिळक खंड ३ पृ. २९७

५३) समग्र लोकमान्य टिळक खंड ६ पृ. ६२५ व ६२७

५४) किर धनंजय लोकमान्य टिळक व राजर्षी शाहू महाराज, पृ. २९

५५) समग्र लोकमान्य टिळक खंड १ पृ. ४०-४१.

.......